MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष एकोणिसावे / अंक ८ / ऑगस्ट २०१८

## संपादकीय

### कवी मनाचा द्रष्टा नेता - अटलजी



साने गुरुजींच्या 'भारतीय संस्कृती' या प्रसिद्ध पुस्तकात 'मृत्यूचे काव्य' हे एक नितांत लोभस प्रकरण आहे. भारतीय संस्कृतीत ठिकठिकाणी उद्धृत केलेले मृत्यूसंबंधीचे भव्य विचार साने गुरुजी यात मांडतात. 'मृत्यू म्हणजे महायात्रा, महाप्रस्थान, महानिद्रा. मृत्यू म्हणजे आईच्या कुशीत जाऊन झोपणे. मृत्यू म्हणजे माहेरी जाऊन येणे. मरण म्हणजे विश्रांती, मृत्यु म्हणजे अनंतात स्नान, मरण म्हणजे एक प्रकारे विस्मरण.' अशा कितीतरी अवतरणांनी मृत्यूचे वर्णन केले आहे. भारतीय विचाराने मृत्यूला कधीच नकारात्मक दृष्टीने पाहिले नाही. भारताचे भूतपूर्व पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या जाण्याने मृत्यूबद्दल पुन्हा एकदा नव्याने विचार करावा अशी मनाची अवस्था होते. अटलजींनी मृत्यूलाच म्हटलंय...

'काल के कपाल पर लिखता मिटाता हूँ। गीत नया गाता हूँ।।'

साने गुरुजी म्हणतात - 'सॉक्रेटीस मरताना अमृतत्त्व भोगीत होता. गटे मरताना म्हणाला - 'अधिक प्रकाश, अधिक प्रकाश'. तुकाराम महाराज 'रामकृष्णहरी' करीत गेले. समर्थ म्हणाले, ''माझा दासबोध आहे, रडता का?'' लोकमान्य 'यदा यदा ही धर्मस्य' हा श्लोक म्हणत गेले. पंडित मोतीलाल नेहरू गायत्री मंत्र म्हणत गेले. देशबंधू दास ''आलो, तुझ्या प्रियतम दारात, दिवा पुन्हा पेटविण्यासाठी आलो'' असे म्हणाले. हरिभाऊ आपट्यांजवळ मरताना नामदार गोखले म्हणाले, 'हरिभाऊ! या जगाची गंमत पाहिली. आता त्या जगातील पाहू.'' भगिनी निवेदिता निजधामाला जाताना म्हणाल्या, ''तो पहा उषःकाल होत आहे. भारताचा उषःकाल येत आहे. प्रकाश पाहून मी मरत आहे. धन्य!''

वरील उदाहरणांत मृत्यूचे संगीत ऐकावयास मिळते. मनाला प्रश्न पडतो की, अटलजींसारखा धीरोदात्त नेताही मृत्यूच्या दारात मोठ्या आशावादी जीवनदृष्टीने गेला असेल. आयुष्यभर देशाप्रती असलेल्या अजोड निष्ठेनी जगून

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**

आपले जीवन-पुष्प भारतमातेच्या चरणी अर्पण करताना त्यांना धन्यता वाटली असेल. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी 'सागरास' या कवितेत म्हटल्याप्रमाणे -

'गुणसुमने मी वेचियली या भावे।
की तिने सुगंधा घ्यावे।।'

अटलजींनी आपल्या आयुष्यात जी गुणांची खाण मिळवली ती केवळ 'भारतमातेने' (तिने) सुगंधासाठी घेण्यास मिळवली. 'राष्ट्राय स्वाहा! इदं न मम' हा विचार अटलजींनी आयुष्यभर आचरणात आणला.

काळाच्या कपाळावर लिहिलेले परत मोडायचा व नव्याने लिहिण्याचा धाडसी प्रयत्न अटलजींची कविता करते. अटलजी एक थोर नेते, सालस व्यक्तिमत्त्वाचे राजकारणी, धुरंधर वक्ते व संवेदनशील नागरिक होते. त्यांच्या राजकारणाबद्दल व वक्तृत्वाबद्दल भरभरून लिहिता येईल. त्यांची कविता ही बहुप्रसवा होती, जगण्याकडे एक नवा आयाम देणारी होती.

अटलजींच्या व्यक्तिमत्त्वाचा मागोवा त्यांच्या काव्यातून घेण्यास बराच वाव आहे. 'फकिरी' हा एकच शब्द त्यांच्या काव्यातून प्रतीत होतो. प्रताप भानू मेहता या प्रख्यात लेखकाने इंडियन एक्स्प्रेसच्या १६ ऑगस्ट २०१८ च्या लेखात यावर प्रकाश टाकला आहे.

अटलींच्याच भाषेत सांगायचं झालं तर -

''मन हारकर मैदान नही जीते जाते है।
ना मैदान जीतने से मन जीते जाते है।।
मनुष्य की पहचान उसके धन या आसनसे नही होती।
उसके मनसे होती है।
मनकी फकिरी पर कुबेर की संपदाभी रोती है।

अटलजी ही फकिरी आयुष्यभर जगले. संत कबीराने देखील 'मन लागो यार फकिरी मे।' असाच उद्घोष केला. एक दिवस हे विश्व सोडून निघून जायचंय, मग विनाकारण मगरुरी का करायची असा सल्ला दासकबीर देतात. अटलजींच्या कवितेचे साकल्याने आकलन केल्यास काही गोष्टी सहज दृष्टीपथात येतात. त्यातील महत्त्वाची बाब म्हणजे त्यांची कविता राष्ट्रवादाने ओतप्रोत भरलेली होती. राष्ट्रीय स्वयंसेवक संघात त्यांचा उमेदीचा बहुतांश काळ गेला. भारतीय संस्कृती, भारतीय विचार विशेषतः 'हिंदू जीवन' हा या कवितेचा केंद्रबिंदू होता -

'मैने छाती का लहू पिला, पाले विदेश के क्षुधित लाल।
मुझको मानव मे भेद नही, मेरा अन्तस्थल वर विशाल।
जगसे ठुकराए लोगों को लो मेरे घरका खुला द्वार।
अपना सबकुछ हूँ लुटा चुका, फिर भी अक्षय है धनागार।
मीरा हीरा पाकर ज्योतित परकीयों का वह राजमुकुट।
यदी इन चरणों पर झुक जाए कल वह किरीट तो क्या विस्मय।
हिंदू तन-मन, हिंदू जीवन, रग-रग हिंदू मेरा परिचय।

भारताच्या सर्वसमावेशी व सर्व पंथसहिष्णू संस्कृतीचे गुणगान अटलजी आपल्या कवितेत करतात. संघाच्या राष्ट्रभक्तीच्या मुशीत तयार झालेले अटलजी अजातशत्रू होते. जात, धर्म, पंथ इत्यादी संकुचित विचारांच्या पलीकडे ते पोचले होते. भारताला त्यांनी कधी जमिनीचा तुकडा वा नकाशातील एक भाग मानलं नाही. त्यांच्यासाठी भारत एक जीवंत राष्ट्रपुरुष होता; ज्याचं मस्तक हिमालय, कश्मीर मुकुट आहे तर, पंजाब व बंगाल हे दोन विशाल बाहू असून कन्याकुमारी हे त्याचे चरण आहेत. ते म्हणत -

'यह चन्दन की भूमी है। अभिनंदन की भूमी है।
यह तर्पण की भूमी है। यह अर्पण की भूमी है।
इसका कंकर-कंकर शंकर है।
इसका बिंदू बिंदू गंगाजल है।
हम जियेंगे तो इसके लिये
मरेंगे तो इसके लिये।

(पृष्ठ क्र.४० वर)

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.
# दिशा

## वर्ष एकोणिसावे/अंक ८/ऑगस्ट २०१८

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २३ वे/अंक २ रा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | प्रा. प्रशांत पु. धर्माधिकारी | |
| २) | बेल्ट अँड रोड नवनिर्मिती शिबिर | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | आरोग्यवेध-०८ नागीण १ | श्री. नरेंद्र गोळे | ७ |
| ४) | ओळख वनस्पतींची - करंज | श्री. प्रकाश दुधाळकर | १३ |
| ५) | देश-परदेश : एक अनोखा अनुभव | गौरी अंबाजी परब | १५ |
| ६) | 'कैलासराणा शिवचंद्रमौळी' | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | १८ |
| ७) | ऋण मातृत्वाचे | सौ. सुरेखा संजय ठाणेकर | २९ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | ३१ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- ❖ आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- ❖ हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- ❖ शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- ❖ आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- ❖ आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- ❖ आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- ❖ दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- ❖ आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- ❖ www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- ❖ वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- ❖ कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# बेल्ट अँड रोड नवनिर्मिती शिबीर

*बेजिंग शहरात डिसेंबर २०१७ मध्ये शालेय विद्यार्थ्यासाठी नवनिर्मिती शिबीर आयोजित करण्यात आले होते. त्या शिबिरातील अनुभव या लेखात विशद केलेले आहेत. - संपादक*

चीनच्या बेल्ट अँड रोड या महत्त्वाकांक्षी परियोजनेची माहिती दिशा मासिकाच्या जुलै महिन्याच्या अंकात देण्यात आली होती. शेजारील देशांमध्ये दळणवळणाच्या चांगल्या सुविधा निर्माण करण्याच्या इराद्याने ही परियोजना आखण्यात आलेली आहे. त्याला अनेक देशांनी चांगला प्रतिसाद दिलेला आहे. काही देशांमध्ये काम देखील सुरू झालेले आहे. २०१६ मध्ये योजनेत सहभागी देशांच्या प्रतिनिधींना एका सभेसाठी चीनमध्ये पाचारण करण्यात आले होते. या सभेला मोठी उपस्थिती होती. शेजारील देशांच्या राजकारण्यांकडून आणि नोकरशहांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळतो आहे याची खात्री झाल्यावर चिनी विचारवंतानी या योजनेत शाळकरी विद्यार्थ्यांना सामविष्ट करून घेण्याचे ठरविले. त्यांच्यासाठी त्यांनी बेल्ट अँड रोड नवनिर्मिती शिबिरांचे (Belt and Road Innovation Camp) आयोजन करण्याची योजना आखली. या योजनेतील पहिले नवनिर्मिती शिबिर १३ ते १९ डिसेंबर २०१७ या कालवधीत बेजिंग शहरात आयोजित करण्यात आले होते. अशा शिबिरांचे आयोजन करण्याच्या अनुभव चीन विज्ञान तंत्रज्ञान संघटनेच्या बालविभागाला (Children and Youth Science Centre of the China Association of Science and Technology) आहे. मागील अनेक वर्षे हा विभाग किशोरांसाठी 'विज्ञान तंत्रज्ञान नवनिर्मिती स्पर्धा' (China Adolescent Science and Technology Innovation Contest) यशस्वीपणे आयोजित करीत आहे. त्याच विभागाकडे या शिबिराचे आयोजन करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली होती. युरोप आणि आशिया खंडातील सुमारे २० देशांना या शिबिराचे निमंत्रण पाठविण्यात आले होते. त्यात भारताचा देखील समावेश होता. मागील अकरा वर्षे विद्या प्रसारक मंडळाच्या सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळेतील विद्यार्थी चीनच्या नवनिर्मिती स्पर्धेत सहभागी होत आलेले आहेत. त्यामुळे सहजिकच या शिबिराचे निमंत्रण देखील विद्या प्रसारक मंडळाला आले. त्यांच्या निमंत्रणावरून या शाळेतील पाच विद्यार्थी बेजिंग येथे झालेल्या नवनिर्मिती शिबिरात सहभागी झाले होते. या शिबिराची माहिती या लेखात दिलेली आहे.




**बेल्ट अँड रोड शिबिरात सहभागी झालेली भारतीय चमू**

शिबिराची सुरुवात सांस्कृतिक कार्यक्रमाने (Cultural Programme) झाली. यात प्रत्येक देशाच्या प्रतिनिधीने आपल्या देशाच्या संस्कृतीची ओळख होईल अशा पद्धतीने कार्यक्रम सादर करावयाचा होता. बहुतेक देशांच्या मुलांनी त्यांच्या देशातील पारंपरिक नृत्ये (Traditional dances) सादर केली. आम्ही मात्र, 'इतनी शक्ती हमे देना दाता...' हे हिंदी गाणे सादर केले. त्याआधी मी गाण्याची पार्श्वभूमी आणि त्याचा मतितार्थ समजावून दिला. त्यामुळे गाण्याला प्रतिसाद

अंधश्रद्धेचा त्याग करणे हेच तत्त्वज्ञानाच्या मार्गावरील पहिले पाऊल. - डी. डिडेरॉट

चांगला मिळाला. सांस्कृतिक कार्यक्रमाबरोबरच भोजनाची देखील सोय त्याच सभागृहात केली होती. त्यामुळे शिबिरासाठी आलेल्या प्रतिनिधींना एकेमेकांशी संपर्क साधणे सोपे झाले. वेगवेगळ्या संस्कृतीतून आलेल्या मुलांमध्ये एकोपा निर्माण करण्याचा हा चांगला मार्ग आहे असे मला वाटते.




**भारतीय विद्यार्थी गीत सादर करीत असताना**

दुसऱ्या दिवशी सकाळीच शिबिराचे उद्घाटन करायचे ठरले होते. त्यासाठी न्याहारी झाल्याबरोबर आम्हाला शिबिराच्या ठिकाणी नेण्यात आले. या महत्त्वाच्या शिबिरांसाठी त्यांनी निवड केली होती एका महापालिकेच्या शाळेची. महापालिकेची शाळा म्हणजे फारशी सुविधा नसलेली, गरीब कुटुंबातून येणाऱ्या मुलांसाठी चालविली जाणारी शाळा असे आपले मत असते. या शाळेत प्रवेश करताक्षणीच आपल्या या मताला तडा जातो. सुसज्य अशा प्रयोगशाळांनी युक्त मोठ्या परिसरात पसरलेली अशी ही देखणी शाळा होती. ती शाळा आणि त्यातील सुविधा यावर एक वेगळा लेख लिहिण्याचा मानस आहे. त्यामुळे येथे शाळेचे वर्णन करण्याचा मोह टाळतो. सकाळी आम्ही जेव्हा शाळेत पोहोचलो तेव्हा आम्हाला एका मोठ्या सभागृहात नेण्यात आले. या सभागृहाच्या एका बाजूला एक मोठा फलक लावून ठेवण्यात आला होता. या फलकावर शिबिरासाठी आलेल्या प्रत्येक व्यक्तीने सही करावी असे आम्हाला सांगण्यात आले. त्याबरोबर सही करण्यासाठी फलकाजवळ एकच झुंबड उडाली. हा कार्यक्रम काही वेळ चालला.




**फलकावर सही करण्यासाठी उडालेली झुंबड**

सह्या करण्याचा कार्यक्रम आटोपल्यावर एक ग्रुप फोटो काढण्यात आला. त्यानंतर उद्घाटन सोहळ्याला सुरुवात झाली. बेल्ट अँड रोड योजनेतील हे पहिलेच शिबिर असल्याने अनेक देशांच्या दूतावासातील लोकांना उद्घाटन सोहळ्याला पाचारण करण्यात आले होते. आयोजकांच्या विनंतीला मान देऊन अनेक देशांचे चीनमधील प्रतिनिधी तेथे उपस्थित होते. मात्र भारतीय दूतावासातील कोणीही तिकडे फिरकले नाही. उद्घाटनाचा कार्यक्रम अतिशय सुटसुटीत असा आयोजित करण्यात आला होता. प्रथम विविध देशांच्या विद्यार्थ्यांना क्रमाने व्यासपीठावर पाचारण करण्यात आले. त्यानंतर शिबिराची पार्श्वभूमी स्पष्ट करण्यात आली. कोणत्याही राजकीय व्यक्तीला या सोहळ्यासाठी बोलविण्यात आले नव्हते. चीन विज्ञान तंत्रज्ञान संघटनेच्या अधिकाऱ्यांनीच शिबिराचे उद्घाटन केले. त्यासाठी त्यांनी वापरलेली युक्ती देखील नामी होती. एका टेबलाच्या मागे हे सगळे अधिकारी उभे राहिले. टेबलाच्या पुढच्या बाजूला एक काळ्या रंगाचे कापड लावले होते. रंगीत भुकटीने भरलेली डबी प्रत्येकाच्या हातात दिलेली होती. त्यानी ती भुकटी काळ्या कापडावर टाकावी अशी अपेक्षा होती. तसे जेव्हा केले तेव्हा काळ्या कापडावर अक्षरे उमटू लागली. सगळा मजकूर स्पष्टपणे वाचता येऊ लागल्यावर सर्वांनी टाळ्या वाजवून दाद दिली. अगदी थोड्या वेळात आणि दिमाखदार पद्धतीने उद्घाटन सोहळा पार पडला. या सोहळ्यानंतर एका तरुण शास्त्रज्ञाचे व्याख्यान झाले.

जे चिकाटीने काम करतात, त्यांचा कैवार देव घेतो. - कुराण

चीनमध्ये संशोधनाची संस्कृती कशा पद्धतीने मूळ धरत आहे आणि चिनी तरुण या कामात आपले कसे योगदान देत आहेत हे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर तो स्वतः करीत असलेल्या कामाबद्दल थोडेसे बोलला. त्याचे संशोधनाचे क्षेत्र कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) असे आहे. त्या विषयाची थोडक्यात माहिती त्यांनी दिली. शाळकरी विद्यार्थ्यांसाठी हे दोन्ही फारच उपयुक्त ठरले. ज्याला आपल्या कामाची माहिती देताना आनंद आणि अभिमान वाटतो आहे अशा एका तरुण शास्त्रज्ञाला ते जवळून पाहात होते.





**शिबिराचा उद्घाटन सोहळा**

नवनिर्मितीची संधी देणे हा या शिबिराचा मूळ उद्देश होता. त्यासाठी त्यांनी काही विषय आधीच निवडले होते. त्यातील कोणत्या विषयात तुम्हाला काम करायला आवडेल हे ठरविण्याची मुभा प्रत्येकाला देण्यात आली होती. त्यानुसार विद्यार्थ्यांचे गट पाडण्यात आले होते. त्यामुळे आमचे पाच विद्यार्थी चार वेगवेगळ्या गटांत विभागले गेले. प्रत्येक गटाला काम करायला स्वतंत्र प्रयोगशाळा आणि मार्गदर्शक होते. त्यांनी दोन दिवसात काहीतरी नवीन निर्माण करून शेवटच्या दिवशी ते सादर करावे अशी अपेक्षा होती. त्यासाठी लागणाऱ्या सर्व सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. उदाहरणच द्यायचे झाले तर त्रिमितीय छपाईचे (Three Dimensional Printing) देता येईल. त्रिमितीय छपाई यंत्राचा वापर करून मुलांनी नवीन वस्तू बनवून दाखवावी अशी अपेक्षा होती. त्यासाठी त्या गटाला अशा प्रयोगशाळेत नेले होते की, तेथे सुमारे २५ छपाई यंत्रे उपलब्ध होती आणि त्याचा वापर करून बनविलेल्या अनेक वस्तू तेथे ठेवल्या होत्या.




**त्रिमितीय यंत्राच्या मदतीने बनविलेल्या वस्तू**

विद्यार्थ्यांना जेव्हा प्रयोगशाळेत कामाला लावले तेव्हा त्यांच्यासोबत आलेल्या शिक्षकांसाठी एका परिसंवादाचे (Science Education Forum) आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादात वेगवेगळ्या देशांच्या प्रतिनिधींनी त्यांच्या देशातील विज्ञान शिक्षण कसे चालते याची माहिती द्यावी अशी अपेक्षा होती. भारतीय विज्ञान शिक्षण या विषयावर मी माझे मत मांडले. माझ्याखेरीज चीन, पाकिस्तान, इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया इत्यादी देशांच्या प्रतिनिधींनी त्यांच्या देशातील विज्ञान शिक्षणाची वैशिष्टे सांगितली. प्रत्येक सादरीकरणानंतर प्रश्नोत्तरांसाठी वेळ दिला जात असे. त्यामुळे अनेक संकल्पना स्पष्ट झाल्या. या परिसंवादामुळे वेगवेगळ्या देशांत विज्ञान शिक्षण कसे चालते याची चांगली माहिती उपस्थित सभासदांना झाली.




**चीनमधील विज्ञान शिक्षण यावर सादरीकरण**

दोन दिवस प्रयोगशाळेत काम केल्यावर प्रत्येक गटाला त्यांनी निर्माण केलेल्या वस्तूचे सादरीकरण करण्यास सांगण्यात आले. त्यांच्या सादरीकरणाचे मूल्यमापन करण्यासाठी एक परीक्षक गट निवडण्यात आला. त्यामध्ये वेगवेगळ्या देशांचे प्रतिनिधी येतील याची काळजी घेण्यात आली. परीक्षक गटाला एक मूल्यमापन तक्ता देण्यात आला जेणेकरून ते नवनिर्मित वस्तूचे अनेक अंगाने परीक्षण करू शकतील. परीक्षणाला सुरुवात करण्यापूर्वी सर्व परीक्षकांची एक सभा घेण्यात आली आणि त्यांना त्यांच्या कामाची कल्पना देण्यात आली. प्रत्येक सादरीकरणानंतर परीक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारावेत आणि त्यांना विषय किती कळला आहे हे तपासून पहावे अशी अपेक्षा होती. सगळ्या परीक्षकांनी आपापल्या निकालाचा तक्ता आयोजकांच्या हाती सुपूर्द केला. त्या सगळ्या गुणांचे एकत्रीकरण करून अंतिम निर्णय घेण्यात आला.



**विद्यार्थ्यांचे सादरीकरण**

उद्‌घाटनाचा कार्यक्रम शाळेत आयोजित केला. निरोप समारंभ मात्र हॉटेलमध्ये आयोजित करण्यात आला होता. उद्‌घाटनाप्रमाणेच निरोप समारंभ देखील दिमाखदार होता. या समारंभात प्रत्येक विद्यार्थ्याला उपस्थिती प्रमाणपत्र देण्यात आले. याखेरीज परीक्षकांनी दिलेल्या मूल्यमापन तक्त्याच्या आधारे वेगवेगळी पारितोषिके विद्यार्थ्यांना देण्यात आली. काही गटांना उत्तम सादरीकरणाचे बक्षीस, काहींना उत्तम कामाचे बक्षीस, तर काही गटांना उत्तम गटकार्याचे बक्षीस देण्यात आले.




**पारितोषिक वितरण सोहळा**

बेल्ट अँड रोड नवनिर्मिती शिबिरात सहभागी झाल्याने आम्हाला अनेक नवीन गोष्टी शिकायला मिळाल्या. वेगवेगळ्या देशांतील विज्ञान शिक्षणाची माहिती झाली. त्या त्या देशात काम करणाऱ्या वैज्ञनिकांशी आम्हाला जवळून संपर्क साधता आला. आमच्यापेक्षा जास्त फायदा झाला तो शिबिरात सहभागी झालेल्या पाच विद्यार्थ्यांचा. 'ऐका, पाठ करा आणि परीक्षेत ओका' या चाकोरीबाहेर काही वेगळे जग आहे याची त्यांना जाणीव झाली. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे नवनिर्मितीच्या प्रक्रीयेत त्यांना स्वतःला सहभागी होता आले. हा आनंद काही वेगळाच होता. त्यात भर पडली ती त्यांना मिळालेल्या प्रमाणपत्राने आणि पदकाने.



**प्रमाणपत्र आणि पदकासह ठाण्याचे विद्यार्थी**

**- डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण-शीळ रोड, काटई,
ता. कल्याण, जि. ठाणे - ४२१२०४

जनसमूहावर विश्वास ठेवू नका; जनतेला एकच मन असते. - फोसिलाइड्स

# आरोग्यवेध-०८ नागीण (१)

*नागीण ह्या आजाराबाबत या लेखात माहिती विशद करण्यात आली आहे - संपादक*

**दुःखाचे स्वरूप**

घर छोड के चले थे, खुशी की तलाश में,
खुशी की तलाश में,
गम राह में खडे थे, वहीं साथ हो लिये,
यूँ हसरतों के दाग मोहोब्बत में धो लिये
खुद दिल से दिल की बात कहीं, और रो लिये

अशाप्रकारे सुखाच्या शोधार्थ घराबाहेर पडलेल्यांच्या वाटेवरच उभी असणारी दुःखे, त्यांची सोबत करू लागतात. मग स्वतःलाच त्या दुःखाचा सल सांगून रडून घ्यायची पाळी येते. त्यामुळे दुःख म्हणजे काय हे कुणालाही सांगावे लागत नाही. जन्म घेणारी बालके तर दुःख सहन न होऊन रडत रडतच ह्या जगात अवतीर्ण होत असतात.

विख्यात फ्रेंच कादंबरीकार व्हिक्टर ह्युगो ह्यांची गाजलेली कादंबरी म्हणजे 'ला मिझरेबल्स'. मराठीत भा.रा.भागवतांनी तिचा सुरेख अनुवादही केलेला आहे 'दुःख पर्वताएवढे'. त्या कादंबरीतील व्यक्तीरेखा एकापेक्षा एक अधिक दुःख सोसणाऱ्या असतात. त्यांच्या दुःखांपुढे आपल्याला आपली दुःखे कःपदार्थ वाटू लागतात. मात्र त्यांच्या दुःखातील अनुभूती आपलीच आहे की काय, असे क्षणभर वाटून वाचक आपली नाळ त्या कादंबरीशी जोडून घेतो. ती कादंबरी अशा रीतीनेच विश्वविख्यात झालेली आहे.

दुःखे केवळ शारीरिकच असतात असे नव्हे तर दुःखे मानसिकही असतात. एम.जी.रामचंद्रन निवर्तले ही बातमी ऐकूनच काही लोकांना इतके अपार दुःख झाले की, त्यांनी साक्षात मृत्यूला जवळ केले. पराभवाच्या भीतीने आत्महत्या करणारा विख्यात हुकूमशहा हिटलर तर सर्वश्रुतच आहे. मात्र अशा दुःखांची जातकुळी मानसिकच असते.

शारीरिक दुःखेही पराकोटीची असू शकतात. एवढी की त्यापेक्षा ते दुःखित, मृत्यूही आनंदाने पत्करतात. ८०-९० टक्के भाजल्याने होरपळलेले लोक जेव्हा त्यातच जातात, तेव्हा नातेवाईकही सुटकेचा निश्वास टाकतात. कारण त्या होरपळलेल्यांचे दुःख केवळ त्यांनाच जाळत नसते, तर नातेवाईकांनाही ते असह्य होऊन जात असते.

आपलीच अनेक दुःखे, अनेकदा तुल्यबळ राहत नाहीत. जेव्हा दात दुखत असतो, तेव्हा असे वाटते की ह्या जगात दातदुखीसारखी दुखीच नाही. पोट दुखणारेही ह्याच मताचे असतात. अर्धशिशीने डोके दुखणारेही असेच मत व्यक्त करतात. अस्थिभंगाच्या प्रकरणांत तर ठणका सहन न झाल्याने विव्हळणारे आपल्या दुःखाचे वर्णनही करण्यास असमर्थ ठरतात. म्हणून एक असे कुतूहल निर्माण होते की दुःखाचे खरे स्वरूप असते तरी कसे?

मला नागीण झाली, तेव्हा ही सारीच दुःखे मला क्षुल्लक भासू लागली. नागीण ह्या आजारात चेतातंतूदाह होऊन दुःखाची निर्मिती होते. चेतातंतूच्या मार्गावर कोरडेपणा, तडतड, जळजळ, आग अशा संमिश्र भावना जाणवू लागतात. जळीताच्या प्रकरणासारख्याच, लालसर पुळ्या उमटू लागतात. त्या वाढत वाढत परस्परांस भेटतात.

फुटतात. खूप आग होते. यथावकाश (सुमारे एक ते दोन सप्ताहांतच) खपल्या पडून पुळ्या बऱ्या होऊ लागतात. मात्र त्रास कमी होतच नाही. पुळ्या ही केवळ मूळ त्रासाची अभिव्यक्ती असते. ह्या आजारात बाह्य लक्षणे ही मूळ त्रासाची केवळ अभिव्यक्ती असतात. दुःखानुनयी असतात. लक्षणे ही दुःखपर्यवसायी असण्याची आपली सवय मात्र, लक्षणे बरी होताच दुःख कमी होण्याची अपेक्षा करू लागते. अशा प्रकारच्या विपरित करणीचे, अनेक महिने टिकून राहणारे अपार दुःख, नागीण अनुभवास आणते.

नागीण हा आजार कांजिण्यांच्या विषाणूंमुळे होतो. कांजिण्या होऊन गेल्यानंतर काही जणांच्या शरीरात हे विषाणू लपून राहतात. अनेक वर्षांनी विषाणू चेतारज्जूतून एखाद्या नसेमार्फत पसरून त्वचेवर फोड निर्माण करतात. नागिणीची तीव्रता वयाबरोबर वाढते. उतार वयात नागिणीचा जास्त त्रास होतो.

**रोगनिदान**: हे विषाणू चेतातंतूच्या रेषेवर वाढतात. सुरुवातीस त्या चेतातंतूंच्या मार्गावर खूप दुखते. तीन चार दिवसांत तेथील त्वचेवर लालपणा येतो. पाठोपाठ पाण्याने भरलेले दुसरे फोड येतात. हे फोड छोटे छोटे व एकत्र पुंजक्यामध्ये येतात. पाच ते सहा दिवसांत वर खपली धरून वाळू लागतात. फोड गेले की दुखणे बहुधा थांबते. पण काही वेळा पुढेही काही महिन्यांपर्यंत दुखरेपणा टिकतो.

सामान्यपणे हा आजार बरगड्यांमधील चेतातंतूंच्या रेषेवर दिसतो. कधीकधी चेहरा किंवा हातांमधील चेतांवरही परिणाम दिसतो. शरीराच्या एकाच बाजूला बहुतेक करून आजार होतो. शरीराची मध्यरेषा ओलांडून फोड पुढे जात नाहीत. नागीण हा त्रासदायक आजार आहे. पण फारसे गंभीर परिणाम सहसा होत नाहीत. जर डोळ्यांत फोड आले तर मात्र दृष्टी जाऊ शकते.

**नागिणीसाठी उपचार**: यावर 'असायक्लोव्हिर' हे गुणकारी औषध आहे. पुळ्या उमटल्याच्या दिवशी हे लगेच सुरू केले तर पुरळ लवकर बरे होतात. पण नंतर जी आग होत राहते ती कमी होत नाही. या गोळ्या महाग आहेत. याचे मलमही मिळते. याबरोबरच रुग्णाला धीर द्यावा आणि गैरसमजुती दूर कराव्यात. दुखीसाठी ॲस्पिरिन किंवा पॅमाल द्यावे. हा आजार काही दिवसांत आपोआप बरा होतो. नंतर तीव्र वेदना होतच राहिली तर संबंधित नस मारून टाकण्याचा उपचार करावा लागतो. त्यासाठी तज्ज्ञाला दाखवावे.

**आयुर्वेदाचे दृष्टीकोनातून 'नागीण', महाराष्ट्र–टाईम्समधील वैद्य राजीव कानिटकर ह्यांचा लेख (२)**

आजच्या कलियुगात आणि आधुनिक काळातही अगदी सुशिक्षित व्यक्तीही अनेक भ्रामक कथांना बळी पडत असतात. नागीण या रोगाबद्दलही अशाच अनेक कल्पना आहेत. हा विकार कितीही भयंकर असला, तरी योग्य व वेळीच केलेल्या उपचारांनी तो निश्चितच पूर्ण बरा होतो हे प्रत्येकाने लक्षात घ्यायला हवे. आयुर्वेदात 'कक्षा', 'विसर्प', 'अग्निरोहिणी' अशा नावांनी उल्लेख असलेल्या या विकाराला आपण नागीण, धावरे या नावाने ओळखतो.

**कारणे**: नागीण झालेल्या माणसाचा संपर्क, पित्त वाढविणाऱ्या गोष्टींचे अधिक प्रमाणात सेवन, जागरणे, उन्हातान्हातून खूप काम करणे, एप्रिल–मे–ऑक्टोबर या महिन्यांत किंवा पावसाळ्याच्या मध्यावर होणारे अनेक प्रकारचे विषाणू संसर्ग हे नागीण होण्यास कारणीभूत असतात.

**स्थाने**: डोक्यात, भुवईपासून कपाळावर, कानापासून मानेवर, छातीपासून पाठीवर, पोटापासून पाठीवर, खांद्यापासून हातावर किंवा कंबरेपासून पावलापर्यंत, स्त्री व पुरुषांच्या जननेंद्रियांवर.

---

जे लोकांचे डोळे फोडतात, तेच त्यांना त्यांच्या आंधळेपणाबद्दल दोष देतात. – जॉन मिल्टन

**लक्षणे**: सुरुवातीला नागिणीच्या जागी फक्त वेदना किंवा आग होते. दोन-चार दिवसांत किंवा कधीकधी एका रात्रीतही भाजल्यावर येतात तसे पाण्याचे बारीक बारीक फोड येतात. हे फोड एकत्र गुच्छाच्या स्वरूपात येतात आणि एका विशिष्ट दिशेने वाढत जातात. नागिणीची प्रमुख तीन लक्षणे म्हणजे आग, वेदना किंवा खाज. नागीण झाल्यावर तो भाग लालसर होतो, आतून दडदडीत होतो. अंगावर कपडे सहन होत नाहीत. त्या बाजूवर झोपता येत नाही. जरासा धक्का लागला तरी डोळ्यांतून पाणी येते, संपूर्ण अंगाची आग होते, काही वेळा ताप येतो, झोप लागत नाही. काही दिवसांनंतर हे फोड मोठे होतात. शेजारचे छोटे छोटे फोड एकत्र होऊन मोठे फोड तयार होतात. नंतर ते फुटतात. काही वेळा या फोडांमध्ये पूसुद्धा होतो. फुटल्यावर त्यातील पाणी निघून जाते आणि वरची त्वचा निघून जाऊन आतील मांस दिसू लागते. नंतर त्या मांसावर खपली येते, ती सुकून काळी पडते आणि आत नवीन त्वचा आल्यावर ती खपली गळून पडते.

**काळ** : नागीण किती प्रमाणात झाली आहे, त्यावर त्याचा काळ अवलंबून असतो. पण साधारणतः नागिणीला चार आठवडे तरी लागतात. कांजिण्यांप्रमाणेच साधारणतः याचा बरा होण्याचा प्रवास असतो. फक्त त्या एका आठवड्यात कमी होतात, तर नागीण बरी व्हायला वेळ लागतो. नागीण आयुष्यात शक्यतो एकदाच होते. एड्स किंवा जननेंद्रियांच्या सांसर्गिक रोगांमुळे होणारी नागीण मात्र वारंवार होऊ शकते. वेळीच उपचार न केल्यास किंवा पथ्य न केल्यास नागीण बरी व्हायला खूप वेळ लागतो. वृद्धापकाळात झालेली नागीण बरी व्हायलाही खूप वेळ लागतो. अत्यंत वाईट बाब म्हणजे अशी नागीण बरी झाल्यानंतरही त्या जागेवरची आग किंवा वेदना या नंतर कितीही उपाय योजना केल्या तरी जन्मभर पाठ सोडत नाहीत.

**उपचार**: नागिणीत वेदना, खाज किंवा आग असली तरी प्रमुख चिकित्सा ही पित्तशामक अशीच करावी लागते. पेशंटची तपासणी करून पोटात कामदुधा, गुळवेल सत्त्व, शंखजीरे, गुलकंद, तुळशीचे बी, धने-जिऱ्याचे पाणी, चंदनासव, सारीवाद्यासव यासारखे काढे, मौक्तिकयुक्त कामदुधा, चंदनादी वटी, चंद्रकला रस, संशमनी वटी यासारख्या गोळ्यांची योजना करून दिली जाते. गाईचे १०० वेळा धुऊन शुद्ध केलेले तूप (शतधौतघृत), गेरूची शुद्ध केलेली पावडर आणि दुर्वांचा रस ही तीन औषधे बाहेरून लावण्यासाठी हमखास गुणकारी ठरतात. जोडीला हिरवी मिरची, लसूण चटणी, लोणचे, गरम मसाला, आलं-लसूण- मिरची, तीळ-खोबरं, पंजाबी-चायनीज-चाट, शेंगदाणा-काजू यांसारखे सर्व पित्त वाढवणारे पदार्थ बरे वाटेपर्यंत पूर्ण बंद करणे आवश्यक आहे. पोट साफ ठेवणेही गरजेचे आहे. महत्त्वाचे म्हणजे पहिले आठ-दहा दिवस तरी संपूर्ण घरी राहणे आवश्यक आहे. नागीण काही प्रमाणात संसर्गजन्य आहे. नागीण झालेल्या पेशंटच्या संपर्कात लहान मुले आली तर त्यांना नागीण नाही, पण कांजिण्या येऊ शकतात. घरी राहून नागिणीची जागा जेवढी उघडी राहील तेवढे चांगले असते.

**ह्या रोगाविषयीची विश्वकोशातील माहिती (३)**

**परिसर्पः** (हरपिझ). लाल झालेल्या त्वचेवर उठणाऱ्या व खोल जाणाऱ्या, द्राक्षघडासारखा पुटिका समूहांना 'परिसर्प' म्हणतात. ही विकृती विषाणूजन्य आणि तीव्र स्वरूपाची असते. तिचे दोन प्रकार आढळतात.

१. सामान्य परिसर्प आणि

२. मेखला परिसर्प किंवा 'नागीण' (हरपिझ झॉस्टर)

**सामान्य परिसर्पः** हा एक प्रकारचा विषाणूजन्य त्वचारोग आहे. ओठ, हनुवटी, नाक, तोंड व बाह्य जननेंद्रिये या

---

जनसमूहाची वृत्ती सत्यापेक्षा अफवेवर विश्वास ठेवण्याकडे असते. - सिसेरो

शरीरभागांवर तो बहुतकरून आढळतो. स्थानपरत्वे त्याला निरनिराळी नावेही देतात; उदा. ओष्ठ परिसर्प, जननांग परिसर्प वगैरे. परिसर्प, होमिनिस नावाच्या मध्यम आकारमानाच्या (१८० अब्जांश मीटर व्यासाच्या) विषाणूंच्या संसर्गामुळे रोग उद्भवतो. हे विषाणू दोन प्रकाचे असून त्यांपैकी पहिला प्रकार सामान्यतः ओठ, तोंड या ठिकाणी, तर दुसरा प्रकार सामान्यतः (पण नेहमी नव्हे) जननेंद्रियात आढळतो. हा रोग प्रत्यावर्ती स्वरूपाचा म्हणजे वारंवार त्याच जागी उद्‌भवणारा असून त्याच्या प्रथमोद्भवाचा परिपाक-काल (विषाणू शरीरात शिरल्यापासून रोग-लक्षणे उत्पन्न होईपर्यंतचा काळ) ४ ते ५ दिवसांचा असतो. रोगाची सुरुवात थंडी, वारा किंवा ऊन यांच्या जादा संपर्कानंतर रोगाच्या जागी आग होण्याने किंवा खाज सुटून होते. नंतर त्वचेवर रंजिका दिसतात व त्यावर टाचणीच्या डोक्याच्या आकाराच्या पुटिकांचे समूह दिसू लागतात. सुरुवातीस पुटिकांत स्वच्छ द्रव असतो; परंतु नंतर तो गढूळ बनतो. या पुटिका फुटतात किंवा सुकतात आणि त्यावर खपल्या धरतात. ७ ते १४ दिवसांत रोग संपूर्ण बरा होतो. पुटिकांमध्ये दुय्यम सूक्ष्मजंतू संक्रमण झाल्यास व्रण तयार होतात. इलाजामध्ये जंतुनाशक आणि स्तंभक (आकुंचन करणारी) औषधे ऑरिओमायसिनाचे मलम वापरतात. दुय्यम संक्रमण झाल्यास योग्य प्रतिजैव (अँटिबायॉटिक) औषधे देतात.

**मेखला परिसर्प**: पश्चमूल गुच्छिकांच्या शोथामुळे (दाहयुक्त सुजेमुळे), त्या ज्या भागात तंत्रिका (मज्जा) पुरवतात, त्या त्वचा भागापुरत्या मर्यादित असणाऱ्या संसर्गजन्य परिसर्पाला मेखला परिसर्प किंवा नागीण म्हणतात. कधीकधी पाचव्या मस्तिष्क तंत्रिकेवरील 'त्रिमूल गुच्छिका' आणि सातव्या मस्तिष्क तंत्रिकेवरील 'आनन गुच्छिका' यांनाही ही विकृती होते (या वर्णनातील निरनिराळ्या गुच्छिकांच्या स्पष्टीकरणासाठी विश्वकोशातील 'तंत्रिका तंत्र' ही नोंद पहावी). मेखला परिसर्पाचे विषाणू आणि कांजिण्यांचे विषाणू यांत अतिशय साम्य आहे. या परिसर्पाच्या रोग्याशी संपर्क आलेल्या व्यक्तीमध्ये कांजिण्या झाल्याचे अनेक वेळा आढळते. याउलट कांजिण्यांच्या रोग्याशी संपर्क आल्यामुळे परिसर्प झाल्याचे सहसा आढळत नाही. या दोन विकृतींमध्ये अन्योन्य प्रतिरक्षा (रोगप्रतिकारक्षमता) नसते. मेखला परिसर्प ही विकृती 'तंत्रिका तंत्रा'च्या विकृतीत मोडते.

मेखला परिसर्पाचे कधीकधी 'प्राथमिक' आणि 'दुय्यम' असे वर्गीकरण करतात. यांशिवाय वर दिलेले मस्तिष्क तंत्रिकांसंबंधीचे प्रकार, विशेष प्रकार म्हणून ओळखतात. पाठीच्या मणक्यांचा क्षयरोग, मेरुरज्जूसंबंधीचे अर्बुद (नवीन पेशींची अत्याधिक वाढ होऊन निर्माण झालेली गाठ) किंवा कर्करोगाचा दुय्यम फैलाव. या विकृतींच्या सोबत आढळणाऱ्या परिसर्पाला, दुय्यम परिसर्प म्हणतात. दोन्ही प्रकारांत रोगप्रतिकारक शक्तीचा ऱ्हास हेच मुख्य कारण असते. कोणत्याही प्रकारात विषाणू संक्रमणामुळे गुच्छिकेत रक्तस्राव आणि ऊतकमृत्यू (समान रचना व कार्य असलेल्या पेशींच्या समूहाचा नाश) झाल्याचे आढळते.

मेरुरज्जूत प्रवेश करणाऱ्या पश्चमूलांना संसर्ग झाल्यामुळे, त्या पश्चमूलाशी संबंधित असलेल्या त्वचाभागावर प्रथम त्वक-रक्तिमा येतो आणि नंतर पुटिका उमटतात. पाठीच्या मध्यापासून पुढे छातीच्या मध्यापर्यंत त्वचेवर पुटिका दिसतात. शरीराच्या एकाच बाजूस वेढल्याप्रमाणे पुटिका उमटत जातात म्हणून त्यास 'नागीण' म्हणतात. रोगाच्या सुरुवातीस पट्ट्यासारखा त्वचाभाग अतिसंवेदनाक्षम बनतो, आग किंवा तीव्र वेदना होतात. दोन चार दिवसांतच पुटिका दिसू लागतात व सुरुवातीस त्यामधील द्रव स्वच्छ असतो. काही काळ पुटिका वेगवेगळ्या असतात; परंतु त्यांत पू होऊन त्यांचा संगम होण्याची शक्यता असते. काही दिवसांनंतर या पूयिका

(पूयिका, पूटिका) कोरड्या पडून खपली धरते. खपल्या पडल्यानंतर छोटे छोटे व्रण होतात आणि त्या त्वचाभागाची संवेदना बिघडते. उपद्रवामध्ये मेरुरज्जुशोथ आणि मस्तिष्कशोथ यांचा समावेश होतो. कधीकधी उत्स्फोट (पुरळ) दिसेनासा झाल्यानंतरही तीव्र तंत्रिकाजन्य वेदना चालूच राहतात. अशा वेदना तीन महिन्यांपेक्षा जास्त काळ चालूच राहिल्यास त्या अनिश्चित काळपर्यंत चालूच राहण्याची शक्यता असते. रोगकालात मस्तिष्कमेरूद्रव मेंदू व मेरुरज्जू यांना यांत्रिक आधार म्हणून उपयोगी पडणारा द्रव; 'तंत्रिका तंत्' तपासल्यास लसीका-कोशिका-वृद्धी 'लसीका तंत्र' झाल्याचे आढळते.

त्रिमूल गुच्छिका विकारात कपाळ, डोळे, जीभ, टाळू या ठिकाणी पुटिका उमटतात. त्रिमूल तंत्रिकेच्या नेत्रशाखेच्या पुरवठा विभागात हा रोग बहुतकरून आढळतो. डोळ्यांचे स्वच्छमंडल (बुब्बुळाच्या पुढचा पारदर्शक भाग) आणि नेत्रश्लेष्मकला (नेत्रगोलाच्या पुढील भागावरील बुळबुळीत पातळ पटल) या ठिकाणी पुटिका उमटतात. या विकृतीला 'नेत्र परिसर्प' म्हणतात. पुटिकांत दुय्यम सुक्ष्म-जंतू-संक्रमणामुळे पू होऊन स्वच्छमंडल अपारदर्शक होण्याचा संभव असतो.

आनन गुच्छिका विकारात एकाच बाजूच्या बाह्य कर्णद्वार, कानामागील गंडवर्धाचा (कानाच्या पाठीमागे असलेल्या शंखास्थीच्या निमुळत्या वाढीचा) भाग आणि त्याच बाजूच्या घशातील स्तंभावर पुटिका उमटतात. अलीकडे संशोधनानुसार या विकृतीचे मूळ आनन गुच्छिका नसून आनन तंत्रिकेच्या प्रेरक भागाच्या शोथात असल्याचे सिद्ध झाले आहे.

मेखला परिसर्पावर कोणताही विशिष्ट गुणकारी इलाज उपलब्ध नाही. ऑरिओमायसीन (टेट्रासायक्लीन गट) दररोज १ ग्रॅम चार मात्रांतून विभागून देतात. अॅस्पिरीन, कोडीन इ. वेदनाशामके देतात. अति वेदनाशीलता कमी करण्याकरिता त्वचाभागावर सिंकोकेन (न्युपरकेन) सारखे स्थानीय संवेदनाहारक असलेले मलम लावतात. अलीकडे मोठ्या मात्रेत अंतःक्षेपणाने (इंजेक्शनाने) ब-१२ जीवनसत्त्व आणि तोंडाने कॉर्टिकोस्टेरॉइडे देणे उपयुक्त ठरले आहे. रोगनिदान नक्की होताच कॉर्टिकोस्टेरॉइडे अंतःक्षेपणानेही द्यावीत असे काही तज्ज्ञांचे मत आहे. सुक्ष्मजंतू संक्रमावर योग्य प्रतिजैव औषधे वापरतात. नेत्र परिसर्पावर नेत्रविशारदाकडूनच इलाज करून घेणे इष्ट असते.

**मेखला परिसर्प आणि सामान्य परिसर्प यांमधील प्रमुख फरक पुढील प्रमाणे आहेत.**

| **मेखला परिसर्प** | **सामान्य परिसर्प** |
|---|---|
| प्रत्यावर्ती नसतो. | प्रत्यावर्ती असतो. |
| शरीराच्या अर्ध्या भागातच होतो. | दोन्ही बाजूंस होतो |
| नेहमी तंत्रिका मार्गाने पसरतो | कोठेही पसरतो |
| प्रतिरक्षा कायम उत्पन्न होते | प्रतिरक्षा उत्पन्न होत नाही |
| वेदना अती तीव्र असतात | वेदना सौम्य असतात |
| मस्तिष्क-मेरुद्रवात लसिका-कोशिका-वृद्धी बहुतकरून आढळते | मस्तिष्क-मेरुद्रव नेहमीप्रमाणे असतो |

पूर्णतेची आस हा मानवी मनाला जडलेला सर्वात वाईट रोग. - फँटनिस

**मूळ इंग्रजी शब्दांचे मराठी पर्याय**

| अ.क्र. | मूळ इंग्रजी शब्द | पर्यायी मराठी शब्द |
|---|---|---|
| १ | Antibiotic | प्रतिजैव |
| २ | Blisters | पुटिका, पुयिका, पुळी, पुटकुळी, पुरळ |
| ३ | Cells | कोशिका, पेशी |
| ४ | Herpes | परिसर्प, विसर्प, नागीण |
| ५ | Infection | संसर्ग |
| ६ | Inflammation | दाह, आग, जळजळ, वेदना |
| ७ | Nerves | तंत्रिका, मज्जातंतू, चेतातंतू |
| ८ | Serum | लसिका, रक्तद्रव्य |
| ९ | Tissue | ऊती |
| १० | Virus | विषाणू |

**संदर्भ:**


१. 'आरोग्यविद्या' डॉ. श्याम अष्टेकर http://www.arogyavidya.net/arogyavi/index.php?option=comšcontentview=categorylayout=blogid=461Itemid=584

२. वैद्य राजीव कानिटकर http://maharashtratimes.indiatimes.com/articleshow/9836244.cms

३. विश्वकोशातील नागीणीसंबंधीची माहिती, वा.रा. ढमढेरे व य.त्र्यं. भालेराव, http://www.marathivishwakosh.in/khandas/khand9index.php?option=comšcontentview=articleid=9340Itemid=2

४. आर. बी. स्कॉट संपादित, टेक्स्टबुक ऑफ द प्रॅक्टिस ऑफ मेडिसिन, लंडन, १९७३.

५. आर. जे. वकील संपादित, टेक्स्टबुक ऑफ मेडिसिन, बॉम्बे, १९६९.



**– नरेंद्र गोळे**

१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) – ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com


•••


दिशा नियमित वाचा.

आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.


जे जे अत्युत्तम म्हणून गाजले जाते, ते दुर्मिळ असते; आणि सर्वांगपरिपूर्णता तर फारच कठीण. – सिसेरो

# ओळख वनस्पतींची
# करंज

*'करंज' या वनस्पतीची वैशिष्ट्ये, त्याचे उपयोग, त्याची देखभाल या बाबींवर या लेखात प्रकाश टाकला आहे - संपादक*

चैत्र म्हणजे नव वर्षाचे पहिले पाऊल. चैत्र म्हणजे वैशाख वणव्याची चाहूल. चैत्र म्हणजे घाम अन् उकाडा. चैत्र म्हणजे विविध रंगी फुलांचा सडा. चैत्र म्हणजे फुलांफुलांवरून मधुररसाचा आस्वाद घेत फिरणाऱ्या मधमाशांचा गुंजार. चैत्र म्हणजे सुंदर कोमल, नाजूक पानांनी लगडलेल्या फांद्यांचा पिंजार. चैत्र म्हणजे फांदीफांदीवरून पानांच्या आडोशातून ऐकू येणारी प्रणयातूर साद. चैत्र म्हणजे बांबू वनातून घुमणारा वेणू नाद.



चैत्राचे गारूड एकदा मनावर आरूढ झाले की ते लवकर उतरत नाही. चैत्र म्हणजे चैतन्य. झुडुपांवर, झाडांवर अन् वेलींवर सजलेले फुलांचे गुच्छ पाहून मन हरखून जातं. परिसरात दरवळणाऱ्या सुगंधाची धुंदी काही औरच असते. सकाळी घराबाहेर पडावं तर झाडाखाली फुलांचा सडा शिंपडलेला असतो. पानांच्या झरोक्यातून येणारे सोनेरी किरणांचे कवडसे जेव्हा या फुलांवर पडतात तेव्हा छाया-प्रकाशामुळे होणारा रंगाचा विभ्रम अचंबित करणारा असतो. झाडांझाडांवर, गंधाची, रंगाची व सुरेल गाण्यांची मुक्त मैफील रंगलेली असते. अशाच मैफिलीत प्रथम आपल्या कोमल चकचकीत नाजूक पानांच्या पोपटी सुरांची विलंबित तालात सुरवात करीत करंज अवतरतो. हळूहळू कोवळी लुसलुसीत पाने जून होऊ लागतात. मैफील गर्द हिरव्या रंगाने डोलू लागते. वाऱ्यासोबत पाने आता द्रूत गतीत ताल धरतात अन् मैफिलाला रंग चढत जातो. हिरव्या सुरांचा नजराना पेश करीत असतानाच गर्द लाल तपकीरी रंगाच्या मण्याचे आकार असलेली कळ्यांची बंदीश साकार होत असते. काही दिवसांतच लाल तपकिरी मण्यांमधून असंख्य हिरवी पांढरी टोके मैफिलीचा अंदाज घेण्यासाठी डोकावू लागतात. हळूहळू कळ्यांमधून लाजत बुजत डोकावणाऱ्या पाकळ्या हिरवा रंग मागे टाकत पांढऱ्या स्वच्छ पेहरावात बाहेर येतात. अन् सुरु होते खास ठेवणीतली चीज. झाड धुंद होऊन डोलू लागते. इकडे तिकडे विखूरलेल्या मधमाशा आता फुलांभोवती फेर धरून नाचू लागतात. अन् मैफिलीतल्या सुरात आपलाही सूर मिसळत गुणगुणू लागतात. मधमाशांच्या स्पर्शाने नखाएवढ्या पेलाकार पांढऱ्या फुलांच्या नाजूक पाकळ्या मोहरून जातात. अन् त्यांच्या गालावर सुंदर जांभळा रंग खुलून येतो. मैफील उत्तरोत्तर रंगत जाते. या रंगीत मैफिलीत रंग भरणारे कलाकार आपले रंग पेश करून पायउतार होतात

अन् झाडाखाली विसावतात. त्यांची जागा नवीन कलाकार घेतात. फुलांच्या मंजिऱ्या देठाजवळ पूर्ण फुललेली फुले त्यानंतर आता उमलू घातलेली अन् टोकाकडे लहान लहान होत गेलेल्या कळ्यांचा क्रम अशी सुंदर रचना असते. ही रंगाची उधळण मे अखेरपर्यंत चालूच असते. अन् त्यानंतर मैफिलीचा उत्तरार्ध पुनः हिरव्या सुरांनी सुरू होतो. पानांच्या आडोशात लपलेल्या मंजिऱ्यांमधून चपट्या पोपटी शेंगा डोकावू लागतात. या शेंगांचा आकार एका बाजूने गोलाकार तर दुसऱ्या बाजूने सरळ. आपल्या पक्वांन्नातील करंजीच्या आकारासारख्या. कदाचित या शेंगांच्या आकाराशी असलेल्या साधर्म्यामुळे त्या पदार्थाला करंजी हे नाव पडले असावे. या शेंगा जसजशा जून होत जातात तसा त्यांचा रंग बदलून पिवळसर तपकिरी होतो. या शेंगेमध्ये गर्द लाल तपकिरी रंगाची एकच बी असते. या बियांपासून तेल काढतात. हे तेल जंतूनाशक असून विविध त्वचाविकारात बाह्य उपचारासाठी याचा वापर होतो. हे तेल उग्र व कडू असते. त्याचा वापर ग्रामीण भागात दिव्यासाठी देखील करतात. आता या तेलाचा वापर बायोडिझेल करण्यासाठी होतो. त्यामुळे आता एक पर्यायी पिक म्हणून या वृक्षाकडे पाहिले जाते. हा मूळचा भारतीय वृक्ष असून याचे शास्त्रीय नाव आहे Pongamia pinnata. याची लागवड बियांपासून करतात. याला कोणत्याही प्रकारची पडीक जमीन चालते. याची खोलवर जाणारी मुळे व त्यावरील नत्राची निर्मिती करणाऱ्या गाठी याला दुष्काळी भागात देखील तग धरून राहण्यास मदत करतात. या झाडाची वाढ जलद होत असल्याने १० वर्षातच या वृक्षापासून उत्पन्न मिळण्यास सुरुवात होते. ६० ते ८० फूट वाढणारे व छान गोलाकार घेरा असणारे हे झाड सावलीसाठी मुद्दाम अनेक उद्यानात तसेच रस्त्याच्या कडेला लावण्यात येते. यांच्या पानांमध्ये व फुलांमध्ये नत्राचे प्रमाण भरपूर असल्याने त्यापासून उत्तम खत होऊ शकते. या झाडाचा मुळांपासून, सालीपासून व तेलापासून अनेक औषधे तयार केली जातात. या झाडाच्या लागवडीसाठी शासनाकडून मदत देखील केली जाते. शेतकऱ्यांना उत्पन्नाचा पर्यायी स्रोत म्हणून याकडे आता पाहिले जाते. बियांपासून तेल काढल्यानंतर उरणारी पेंड काही प्रक्रिया केल्यानंतर उत्तम पशू खाद्य म्हणून वापरता येते. यावर अजूनही संशोधन चालू असून नैसर्गिक किडनाशक, जंतूनाशक म्हणून व्यावसायिक दृष्ट्या याला महत्त्व येईल. नाहीपेक्षा एक सुंदर सदाहरीत व टिकावू, कणखर व चवीने कडू असला तरी गोड नाव असलेल्या या सुंदर वृक्षाची आपल्या परिसरात लागवड करायला काय हरकत आहे!

**– प्रकाश दुधाळकर**
एफ–२२, नीता अपार्टमेंट,
मिठागर–नवघर लिंक रोड,
मुलुंड (पू.), मुंबई – ८१.
दूरध्वनी : २१६३ ६०५२
भ्रमणध्वनी – ९८६९५४१९६६

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन–अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

# देश-परदेश : एक अनोखा अनुभव

*छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालय येथे पार पडलेल्या एका विलक्षण सुंदर प्रदर्शनाबद्दल माहिती देणारा लेख- संपादक*

सतरा लाख वर्षांपूर्वी आपल्या पूर्वजांनी दगडापासून पहिले अवजार बनवले. ज्याला 'हातकुऱ्हाड' असे म्हटले जाते. मध्यपूर्व युरोप आणि आशियामध्ये मानव ज्या-ज्या ठिकाणी पोहोचला तेथे तो आपल्यासोबत अवजार बनवण्याची ही तंत्रं घेऊन गेला, ज्याचा उपयोग अनेक गोष्टींसाठी झाला. झाडांच्या साली काढण्यापासून ते अगदी खाण्याकरिता मांसाचे तुकडे कापण्यासाठी इथपासून सुरू झाली आपल्या मानवजातीची गोष्ट. यानंतर मानवाची उत्तरोत्तर प्रगती होत गेली. शेती आणि मातीची भांडी बनवण्याची कला, भांड्यांवरील नक्षीकाम, नवनवीन नगरांचा उदय, व्यापारात झालेली वाढ, व्यापारामुळे विविध लोकांच्या संपर्कात येऊन विचारांची देवाणघेवाण. अनेक मानवनिर्मित उत्पादने (वस्त्र, मसाले इ.) यांना मिळणारी वाढती मागणी यासर्व कारणांमुळे क्रांती घडून आली. तसेच सुमारे २,५०० वर्षांपूर्वी युरोप आणि आशिया खंडांत साम्राज्य काळाला आरंभ झाला. भारतात सम्राट अशोकाच्या शिलालेखांनी लोकांना धर्म आपलासा करण्यास प्रेरित केले. याचे परिणाम विशाल साम्राज्यांमध्ये शांती आणि सामंजस्य प्रस्थापित करण्यात झाले. यानंतर राज्य व धर्माचा विस्तार होऊ लागला. ख्रिश्चन, इस्लाम व पारशी धर्म भारतात आले. परंतु संपूर्ण दक्षिण आशिया व पूर्व आशियामध्ये बौद्ध व हिंदू धर्माचा प्रसार झाला. २००० वर्षांपूर्वी सातवाहन आणि रोमन साम्राज्याच्या काळी हिंदी महासागराच्या व्यापाराचा विकास झाला. अनेक रोमन नाणी, मूर्त्या इ. गोष्टी भारतात उत्खननातून प्राप्त झाल्या आहेत.

यासर्व प्राचीन गोष्टींबद्दल ऐकतानाही फार कुतूहल वाटतं. त्या काळातील नाणी, मूर्त्या, वस्त्रं, शिलालेख, दगडी हत्यारे इ. सर्व कसं असेल याबद्दल मनात प्रश्न निर्माण होतात. अर्थात आपण हे सर्वच इतिहासाच्या पुस्तकात चित्रांमध्ये पाहतो. पण हे सर्व जवळून पाहण्यात व अनुभवण्यात वेगळीच भावना असते. हे सर्व जवळून पाहण्याची व अनुभवण्याची संधी मला मिळाली व मी त्या संधीचं सोनं केलं.

मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय येथे ११ नोव्हेंबर २०१७ ते १८ फेब्रुवारी २०१८ या चार महिन्यांच्या कालावधीत 'India and The World : A History in Nine Stories' असे एक अनोखे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. ब्रिटिश वस्तुसंग्रहालय (लंडन) व नॅशनल वस्तुसंग्रहालय (दिल्ली) यांच्या सहकार्याने याचे आयोजन केले गेले. याला सांस्कृतिक मंत्रीमंडळाचा आधार मिळाला. या प्रदर्शनामध्ये भारतातील निरनिराळ्या खंडांतील, शहरांतील, भागांतील काही सर्वाधिक महत्त्वाच्या गोष्टी व लोकांची विलक्षणीय कला दर्शविण्यात आली. या प्रदर्शनाच्या नावाप्रमाणेच याचे नऊ विभाग करण्यात आले होते. यामध्ये मनुष्याची गोष्ट कधी आणि कशी सुरू झाली. प्रथम उदयास आलेली राज्य, साम्राज्य निर्मिती, राज्य आणि धर्म, देवतांची रूपं, हिंदी महासागराचे व्यापारी, दरबारी संस्कृती, स्वतंत्रतेचा शोध आणि अबाधित वेळ यांचा समावेश होता. या प्रदर्शनातून भारताचे इतर विश्वासोबतचे इतिहासातील योगदान ठळकपणे स्पष्ट होते. या प्रदर्शनाला मी भेट दिली असता मला आवडलेल्या काही गोष्टींचे वर्णन :

महत्त्वाकांक्षेचा शेवट झाला म्हणजे शांततेचे राज्य सुरू होते. - यंग





१) बाहुबली : आपल्याला सगळ्यांना सध्या एकच बाहुबली परिचित आहे. तो म्हणजे चित्रपटातील. परंतु या प्रदर्शनात बाहुबली (कर्नाटक, भारत) अशी एक कांस्याची मूर्ती होती. अगदी कमी शब्दांत बाहुबलीची माहिती देण्यात आली. ती म्हणजे अशी : बाहुबली म्हणजे 'ज्याच्या बाहुंमध्ये बळ आहे असा.' बाहुबली हे पहिले तीर्थंकर ऋषभनाथ यांचे द्वितीय पुत्र होते. आपले बंधू भरत याच्यावर आक्रमण केल्यानंतर पश्चात्ताप झाल्याच्या हेतूने बाहुबली वनात गेले. त्यांच्या पायांवरती वेली वाढल्या. परंतु ते आपल्या तपस्येपासून विचलित झाले नाहीत. यामुळेच बाहुबली हे शारीरिक व मानसिक शक्तीची छबी दर्शवते.

२) नक्षत्र यंत्र : (१२३६ इसवी, काहिरा, इजिप्त) हे पितळ, चांदी आणि तांबे या धातूंमध्ये आढळते. ही एक अशी प्रतिमा आहे जी एका धातूच्या तुकड्यावर सपाट बनलेली असते. याचा उपयोग हे माहीत करून घेण्यासाठी होतो की, आपण कुठे होतात, वेळ काय होती आणि चंद्र व तारे यांचे आकाशातील स्थान काय होते?

३) बौद्ध धर्माचा विस्तार : भारतीय उपमहाद्वीपात बौद्ध धर्माचा नाश झाल्यानंतर याचा विस्तार पूर्ण आशियात झाला. थेरवाद बौद्ध धर्म श्रीलंकेपासून दक्षिण-पूर्व आशियाच्या अधिकतम भागांत पसरला. महायान बौद्ध धर्म चीन, कोरिया व जपानमध्ये पदार्पित व्हायच्या आधी मध्य आशिया व तिबेटमध्ये पोहोचला होता. आपल्या मुलभूत सिद्धांतांवर व उपदेशांवर कायम राहून बौद्ध धर्माने आपल्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येक प्रथा व शैली यांना आत्मसात केले. याचा परिणाम आपल्याला बौद्ध धर्माच्या कलाकृती स्थापत्य तसेच लिखित साहित्य यांतील विविधतेमध्ये दिसून येतो.


४) देवतांची रूपे : यात हिंदू, ख्रिश्चन धर्माची देवता एकत्र दर्शविण्यात आली होती. म्हणजेच गणपती व येशू ख्रिस्त यांची रूपं एकाच ठिकाणी दाखविण्यात आली. त्याखाली दिलेल्या स्पष्टीकरणातून असे समजले की, जसे बाहेरून आलेले धर्म भारतात आपलेसे केले गेले, तसेच भारतात निर्माण झालेले धर्म विश्वाच्या अनेक प्रांतांत स्वीकारले गेले व त्यांचा प्रसार झाला. परदेशात तेथील स्थानिक शैलींनुसार देव-देवतांची प्रतिमा बनवली गेली. धर्म स्थिर नसतात, जसे लोक आणि वस्तू गतिशील असतात. त्याचप्रमाणे आस्थाही गतिशील असते.



५) ओटनी आणि बलनी : ओटनी आणि बलनी ही अशी उपकरणे आहेत जी कापसाला बियांपासून वेगळं करण्यासाठी वापरण्यात येतात. याला पुनर्जन्माची उपमा देण्यात आली आहे. ज्यात एका असंस्कारित कापसाचा पुनर्जन्म वस्त्राच्या रूपात होतो.

६) लाकडी मुखवटे : 'नो' चा शाब्दिक अर्थ होतो 'कलेचे प्रदर्शन'. 'नो' या नृत्य, नाटक व मूक अभिनय यांच्या संयोगाने बनलेल्या धर्म प्रधान नाट्यशैलीची सुरुवात ११ व्या शतकात झाली. ऐतिहासिक, पुराणकथा, तसेच काव्य इत्यादींपासून घेतले गेलेले याचे कथानक साधारणतः दुःखाचे असत. या नाटकातील जवळपास सगळी पात्रे लाकडी मुखवटे घालत. काही अत्यंत भयंकर अशा मुखवट्यांचा समावेशही यात मला पाहायला मिळाला.

७) युनिकोड : शिल्पकार एल. एस्. तल्लूर यांचे हे शिल्प भारतीय परंपरेत वेळेच्या चक्रीय दृष्टीकोनावर आधारलेले आहे. यात शंकर भगवान सिमेंट व धनाच्या एका गोळ्यात बंद असल्याचे प्रतीत होते. हे शिल्प सिमेंट व नाणी यांनी बनवलेले आहे. युनिकोड ही संपूर्ण जगाच्या संगणकांवर वापरली जाणारी प्रणाली आहे जी आपल्या सर्वांना एकसमान बनवण्याच्या संभावनेकडे इशारा करते.








या मला आवडलेल्या काही गोष्टी– याशिवाय शस्त्रप्रदर्शन, त्या काळातील भांडी, त्यावर केलेले आखीव–रेखीव कोरीव काम, नक्षीकाम, अलंकार, वस्त्रे, काचेची सुंदर पात्रे, अक्षरलिपी या सगळ्यांचे एक विलक्षणीय दर्शन मला झाले. एकूणच पाहता मला असे वाटले की आज आपण फक्त तंत्रज्ञानाच्या दृष्टीने प्रगत झालो आहोत. परंतु खरी कला, खरे कौशल्य काय असते याची प्रचीती मला या अप्रतिम प्रदर्शनातून आली. हे प्रदर्शन मला काहीतरी नवीन शिकवण, नवीन माहिती व एक अविस्मरणीय अनुभव देऊन गेले.

**– गौरी अंबाजी परब**
(प्रथम वर्ष – बी. एम्. एम्.)
जोशी–बेडेकर महाविद्यालय,
ठाणे

•••

# 'कैलासराणा शिवचंद्रमौळी'

## भाग : १

*भगवान शिवाचे महात्म्य व बारा ज्योतिर्लिंगांविषयी माहिती देणारा लेख - संपादक*

आपला भारत देश विविधतेने नटलेला आहे. भारतात अनेक धर्मांचे, जातींचे व पंथांचे लोक गेली हजारो वर्षे एकत्र नांदत आहे. भारतातील धर्मांचा विचार केला असता आपल्या निदर्शनास येते की, येथे हिंदू, बौद्ध, जैन, ज्यू, ख्रिस्त, झोरास्ट्रियन, इस्लाम इत्यादी विविध धर्मांचे लोक हजारो वर्षे राहत आहेत. एवढ्या वेगवेगळ्या धर्मीयांची मातृभूमी असणारा भारत हा कदाचित भूतलावरील एकमेव देश असेल. प्राचीन भारतीय संस्कृती व भारतीयत्वाची तीव्र भावना या दोन गोष्टींमुळे भारतातील प्राचीन परंपरा, सभ्यता व वारसा आजपर्यंत टिकून राहण्यास कारणीभूत असावी यात शंका नाही.

भारतामध्ये भगवान शिवाची उपासना करणाऱ्या तसेच स्वतःस शैव पंथीय म्हणवून घेणाऱ्या लोकांची संख्या फार मोठी आहे. सर्वसाधारण हिंदू असे मानतात की, हिंदू धर्मातील देवदेवतांची एकूण संख्या तेहतीस कोटी आहे. परंतु हिंदू धर्मातील बहुसंख्य लोक भगवान शिव व विष्णूची उपासना करताना आढळतात. काही स्वतःला 'शैव' म्हणजे भगवान शिवाची उपासना करणारे मानतात. तर काहीजण स्वतःला 'वैष्णव' पंथीय म्हणजेच भगवान विष्णू व त्याच्या विविध अवतारांची पूजा करणारे मानतात. आपण फक्त महाराष्ट्रापुरता विचार केला तर पंढरपूरचा विठोबा वा विठू माउली म्हणजे विष्णूचाच अवतार मानला जातो. दरवर्षी आषाढी व कार्तिकी एकादशीला पंढरपूरला विठ्ठलाचे लाखो भक्त मोठ्या भक्तीभावाने आपल्या आवडत्या विठोबाचे दर्शन घेण्यासाठी जात असतात. यात वारकरी पंथातील वारकऱ्यांची संख्या जास्त प्रमाणात असते.

वरील विवेचनावरून असे म्हणणे वावगे ठरणार नाही की, हिंदू धर्मामधील शैव व वैष्णव हे दोन प्रमुख पंथ होत. अभ्यासक असे म्हणतात की, साधारणतः पुराण काळापासून भगवान शिव (महादेव) व विष्णूची उपासना जनमानसात लोकप्रिय होऊ लागली. हिंदू धर्म ग्रंथानुसार ब्रह्मा, विष्णू व महेश (शिव) ह्या तीन देवांना अनन्या साधारण महत्त्व आहे. हिंदुंमध्ये सर्वसाधारणपणे अशी श्रद्धा आहे की ब्रह्मदेव सृष्टीचा विधाता म्हणजेच सृष्टीचा रचेता होय. प्रलय आल्यानंतर सर्व सृष्टी नष्ट पावते व प्रलया नंतर ब्रह्मदेव पुन्हा एकदा नव्याने सृष्टीचे निर्माण करत असतो व ही प्रक्रिया सततपणे चालू असते असे हिंदू म्हणतात. ब्रह्मदेव हा सृष्टीचा रचेता तर भगवान विष्णू हा विश्वाचा पालनकर्ता वा पालनहार आहे असे मानले जाते. म्हणजेच सृष्टीचे अधर्मापासून रक्षण करणे व अधर्माचा नाश करून धर्माची स्थापना करणे ही भगवान विष्णूची जबाबदारी मानली जाते. भगवान शिवाचा वास साधारणतः हिमालयात असतो असे मानले जाते. विश्वात प्रमाणाच्या बाहेर पाप व अधर्माचे स्तोम माजल्यावर सृष्टी नष्ट करण्याचे कर्तव्य भगवान शिवाचे आहे असे हिंदू मानतात. महादेवाच्या हस्ते सृष्टी नष्ट होण्याच्या ह्या प्रक्रियेलाच 'प्रलय' असे म्हटले गेले आहे. अशाप्रकारे हिंदू धर्मात ब्रह्मा, विष्णू व महेश (शिव) ह्या तीन देवांना वा त्रिमूर्तींना अनन्य साधारण महत्त्व आहे. जरी ब्रह्मा, विष्णू व शिव

यांच्या ह्या वेगवेगळ्या जबाबदाऱ्या वा भूमिका आहेत असे सर्वसाधारण हिंदू मानत असले तरी, हिंदू धर्मात भगवान विष्णू व भगवान शिवाची उपासना करणाऱ्यांची संख्या फार मोठ्या प्रमाणात आढळते. विष्णू व त्याच्या अवतारांची पूजा करणाऱ्यांना 'वैष्णव' म्हटले जाते, तर भगवान शिवाची (महादेव) उपासना करणाऱ्यांना 'शैव' म्हटले जाते असे आपण अगोदर नमूद केलेच आहे. तसे पाहता बहुतांश हिंदू भगवान विष्णू व भगवान शिव ह्या दोहोंची उपासना करत असताना आपणास आढळतात.

आपण ह्या लेखात प्रामुख्याने भगवान शिव व त्याच्या उपासनेबाबत चर्चा करण्याचा प्रयत्न करणार आहोत. अभ्यासकांचे मत आहे की, शिवाची पूजा ही भारतात फार पुरातन काळापासून केली जाते. काही तज्ज्ञ म्हणतात की, सिंधू संस्कृतीत सापडलेल्या एका मोहोरेवर ज्या देवतेचे चित्र आहे तो 'पशुपतीनाथ' म्हणजे 'शिव' होय. अर्थात, काही अभ्यासकांना हे मान्य नाही. ते म्हणतात की, सिंधू संस्कृतीवर आढळलेला 'पशुपतीनाथ' हा 'शिव' नसून ते चित्र म्हणजे एका बसलेल्या अवस्थेत असलेल्या वृषभाची मुद्रा मोहोर होय. ह्या अभ्यासकांचे असेही म्हणणे आहे की, ह्या मुद्रेतील 'पशुपतीनाथाचे' शिवाशी (महादेवाशी) असलेले साम्य पाहून काही मंडळींनी त्याची तुलना शिवाशी केलेली असावी. खरोखरच, जर आपण ही सिंधू संस्कृतीतील मुद्रा पाहिली तर तीत एक ध्यानात बसलेला योगी असून त्याच्या असपास वाघ, गेंडा, हत्ती इत्यादी वन्यप्राणी आढळतात. हिंदू धर्मातील शिवाची छबी देखील अशीच आहे. महादेवाचा उल्लेख कपाली म्हणजेच गळ्यात मुंडक्यांची माळ घालणारा, गळ्याभोवती सर्पाचा (नागाचा) दागिना असलेला, व्याघ्रचर्मासनावर म्हणजेच वाघाच्या चामडीवर बसणारा व बहुतेक वेळा ध्यानमग्न असलेला व सर्वात मुख्य म्हणजे हिमालयातील कैलासासारख्या पर्वतावर वृक्षवल्ली व पशुपक्ष्यांच्या सानिध्यात असलेला असा येतो वा अशाप्रकारचे महादेवाचे वर्णन आपणास हिंदू धर्मग्रंथांमध्ये केलेले आढळते. येथे आपण महादेवाचा उल्लेख 'ध्यानमग्न' अवस्थेत असलेला असा केला. त्यामुळे येथे अजून एक मुद्दा मांडावासा वाटतो व तो म्हणजे की, महादेवाचे उपासक त्यास 'आद्य योगी' व योगाचा उद्‌गाता असे मानतात. त्यामुळे शैव पंथीय ध्यानास व योगाला अनन्य साधारण महत्त्व देतात. असो. तर मुद्दा असा होता की, सिंधू संस्कृतीतील 'पशुपतीनाथ' म्हणजे 'शिव' हा एक विचारप्रवाह आपणास आढळतो.

असे म्हटले जाते की, 'शिव' ही देवता वैदिक कालीन असून तिचा ऋग्वेदामध्ये 'रुद्र' असा उल्लेख आलेला आहे. हिंदू धर्मीय एकूण अकरा रुद्र होते असे मानतात. ऋग्वेदात उल्लेख आलेली रुद्र ही देवता वायू वा वादळाशी संबंधित असलेली माहिती आपणास मिळते. त्याचप्रमाणे रुद्र हा शिकार करणारा म्हणजेच वाईट प्रवृत्तींचा संहार करणारा देव अशीदेखील वैदिक काळात मान्यता होती असे काही अभ्यासक म्हणतात. ऋग्वेदामध्ये रुद्राचा उल्लेख देवांचा देव अशा स्वरूपानेदेखील आलेला आहे. रुद्र हा वादळाप्रमाणे युद्ध करणारा देव असे देखील वर्णन ऋग्वेदात आढळते. यजुर्वेदातील 'श्री रुद्रम' हा श्लोक रुद्राशी संबंधित आहे असे अभ्यासक मानतात व हा श्लोक शैव पंथीयांसाठी फार महत्त्वाचा मानला जातो. ह्या श्लोकात रुद्राचे वर्णन देवांचा देव असे आलेले आहे. अभ्यासकांचे असे मत आहे की, रुद्राचा उल्लेख सर्वात अगोदर ऋग्वेदात आलेला असून ऋग्वेदात जवळ जवळ तीन पूर्ण श्लोक रुद्राशी निगडित आहेत. असे म्हटले जाते की, ऋग्वेदात रुद्राचा जवळ-जवळ पंचाहत्तरवेळा उल्लेख आलेला आहे. यजुर्वेदात रुद्राचा उल्लेख देवांच्या

हृदयात राहणारा देव असा आलेला आहे. तसेच ऋग्वेदात व यजुर्वेदात मोक्षप्राप्तीसाठी रुद्राची उपासना करावी असे म्हटले असल्याचे अभ्यासक म्हणतात. यजुर्वेदातील तैत्रेय संहितेतील 'श्री रुद्रम्' स्तोत्र हे रुद्राशी संबंधित असून देवतेची विविध नावे सांगण्याचे हे फार पुरातन उदाहरण असल्याचे अभ्यासकांचे मत आहे. तर आपला मूळ मुद्दा असा होता की, 'रुद्र' ह्या देवतेचा उल्लेख ऋग्वेद तसेच यजुर्वेदात येतो व हिंदूंची अशी श्रद्धा आहे की, वेदकालीन 'रुद्र' म्हणजेच नंतरच्या काळात शिव, महादेव वा शंकर नावाने प्रसिद्ध झालेला देव होय. धनुष्यबाण व त्रिशूल ही रुद्राची अस्त्रे होती व ह्या अस्त्रांच्या सहाय्याने रुद्र वाईट गोष्टींचा वा अपप्रवृत्तींचा संहार करत असे.

आपण वर असे विवेचन केले आहे की, वैदिक देवता 'रुद्र' म्हणजचे शिव होय अशी साधारणतः मान्यता आहे. तसे पाहिले तर आपल्या असे लक्षात येते की, रुद्र हा युद्ध करणारा देव असे वर्णन वेदामध्ये आले आहे. धनुष्यबाण व त्रिशूल ही त्याची आयुधे आहेत. रुद्राला अग्नी समान देखील मानलेले आहे. रुद्राची दोन रूपे देखील सांगण्यात आली आहेत व ही दोन रूपे म्हणजे अतिशय भयंकर म्हणजेच घोर व दुसरे रूप अतिशय शांत म्हणजेच शिव हे होय. त्याचप्रमाणे सूर्य म्हणजेच अग्नी हे रुद्राचे रुप, तर शीतल चांदणे देणारा वा सौम्य तेज असलेला चंद्र म्हणजे शिव अशी सर्वसामान्य मान्यता आहे. त्यामुळेच महादेवाच्या वा शिवाच्या जटांवर चंद्रकोर दाखविली जाते. अग्नी ही वैदिक काळातील अतिशय महत्त्वाची देवता होती यात वादच नाही व रुद्राला अग्निचे रूप वा अग्निला रुद्राचेच रूप मानले जाते. त्यामुळे रुद्राचेच रूप मानले गेलेल्या शिवाचे हिंदू धर्मातील महत्त्व अधोरेखित होते.

शिवाची म्हणजेच महादेवाची पूजा व उपासना करणारे हिंदू व प्रामुख्याने 'शैव' पंथीय शिवास म्हणजेच शंकरास खऱ्या अर्थाने देवादीदेव मानतात. भगवान शिवानेच ही सर्व सृष्टी व विश्व निर्माण केले अशी त्यांची निस्सीम श्रद्धा आहे. भगवान शिवानेच विष्णू व ब्रह्मदेवासदेखील निर्माण केले अशी कथा आपणास शिव पुराणात मिळते. या कथेनुसार वा शिवपुराणानुसार भगवान शिवाने सर्व प्रथम भगवान विष्णुला निर्माण केले. भगवान विष्णूला महादेवाने जेव्हा निर्माण केले तेव्हा विष्णू निद्रावस्थेत होता. भगवान विष्णूच्या नाभीतून एक कमळ निर्माण झाले व हे कमळ उमलल्या नंतर त्यातून ब्रह्मदेवाचा जन्म झाला. त्यानंतर भगवान विष्णू व ब्रह्मदेवाने एकमेकांस पाहिले. या कथेत असेही म्हटले आहे की, भगवान शिवाने शक्तीसोबत विष्णूस निर्माण केले. शैव पंथीय हिंदू माता पार्वतीलाच शक्ती वा आदिशक्ती मानतात. भगवान शिव व शक्तीने विष्णूला निर्माण केल्यावर भगवान विष्णू लागलीच ध्यानात गेले व त्यांच्या ध्यानस्थितीतील अवस्थेमुळे उष्णता निर्माण होऊन त्यांच्या शरीरावर जे घर्मबिंदू निर्माण झाले त्यातून सृष्टीतील सागर वा समुद्र निर्माण झाले. यानंतर अगोदर नमूद केल्याप्रमाणे भगवान विष्णूच्या नाभीतील कमळातून ब्रह्मदेवाचा जन्म झाला. ब्रह्मदेवाला वाटले की, तोच ह्या विश्वाचा निर्माता आहे. परंतु भगवान विष्णूने त्याला आपला पुत्र म्हणून संबोधले. त्यावेळी दोघांमध्ये वाद सुरू झाला. भगवान विष्णू म्हणाले की, तू माझ्या नाभीतील कमळातून जन्माला आल्यामुळे तू माझा पुत्र ठरतोस. परंतु ब्रह्मदेवाने हे मान्य केले नाही व भगवान विष्णू व ब्रह्मदेव हे स्वतःस विश्वाचा निर्माता असल्याचे सांगून आपसात भांडू लागले. ह्या भांडणा दरम्यान भगवान विष्णू व ब्रह्माने एकमेकांचा अपमान देखील केला. या दोन देवांमध्ये तुंबळ युद्ध चालू असताना ह्या दोघांच्या बरोबरमध्ये अतिशय प्रकाशमान वा तेजोमय व धगधगणारा (अति उष्ण) प्रकाश झोत वा अग्निस्तंभ अवतरला. हा प्रकाश-झोत भूमीला छेदून पाताळात गेला होता, तर वरच्या दिशेने अवकाशात झेपावला

होता. हा दिव्य प्रकाश-झोत पाताळात किती खोल पर्यंत गेला होता व अवकाशात किती वरपर्यंत गेला होता याचा अंदाज बांधणे अशक्य होते. हा प्रकाश-झोत म्हणजेच महादेवरूपी ज्योतिर्लिंग होते. भगवान विष्णू व ब्रह्मदेव यांच्यात सुरुवातीला जे युद्ध जुंपले होते त्यामुळे सृष्टी निर्माण होण्यापूर्वीच ती नष्ट होईल की काय अशी शक्यता निर्माण झाली होती. मात्र जेव्हा ह्या दोघांच्या दरम्यान प्रकाशमान ज्योतिर्लिंग अवतरले तेव्हा विष्णू व ब्रह्मदेव यांना अचंबीत वाटले व ते दोघेही शांत झाले. यानंतर ब्रह्मा व विष्णूने या तेजोमय ज्योतिर्लिंगाचा शोध घेऊन त्याचे वरचे टोक व त्याचा तळ शोधून काढण्याचे ठरविले. त्याप्रमाणे विष्णूने वराहाचे रूप धारण केले व वराहरूपी विष्णू तेजोमय ज्योतिर्लिंगाचा तळ शोधण्यासाठी आपल्या सुळ्यांच्या सहाय्याने जमीन उकरून पाताळाकडे जाऊ लागला. तर ब्रह्मदेवाने राजहंसाचे रूप धारण केले व तो ज्योतिर्लिंगाचे वरचे टोक गाठण्यासाठी वा त्याचा शोध लावण्यासाठी आकाशाच्या दिशेने झेपावला. अशातऱ्हेने भगवान विष्णू व ब्रह्मदेव ज्योतिर्लिंगाच्या तळाचा व वरच्या टोकाचा अनुक्रमे वराह व राजहंसाच्या रूपाने अनेक वर्षे शोध घेत होते. परंतु ह्या दोघांनाही आपल्या प्रयत्नांत यश आले नाही व शेवटी हे दोघेही जेथून सुरुवात केली होती तेथेच पुन्हा परत आले. ह्या नंतर ह्या दिव्य प्रकाश झोतातून साक्षात देहधारी भगवान शिव अवतरले. ह्या भगवान शिवाला पाच मुखे व दहा भुजा (हात) होत्या. यानंतर भगवान विष्णू व ब्रह्मदेव, भगवान शिवासमोर नतमस्तक झाले व त्यांनी भगवान शिव म्हणजेच महादेव हाच खरा सृष्टीचा रचेता, पालनकर्ता व संहारकर्ता आहे असे मान्य केले. अशा आशयाची कथा आपणास शिवपुराणात आढळते. एका कथेनुसार विष्णू व ब्रह्मदेव ह्या दोघांमध्ये श्रेष्ठत्वावरून झालेले भांडण सोडविण्यासाठी चार वेदांना (ऋग्वेद, अथर्ववेद, यर्जुर्वेद व सामवेद) पाचारण केले. परंतु ह्या चारही वेदांनी भगवान विष्णू व ब्रह्मदेवापेक्षा भगवान शिव श्रेष्ठ असल्याचा निवाडा दिला. अजून एका कथेनुसार असे म्हटले जाते की, ब्रह्मदेवाने प्रकाशमान ज्योतिर्लिंगाचे वरचे टोक पाहिले असे खोटे सांगितले. त्यामुळे ब्रह्मदेव शापित ठरला व त्याची कोणीही पूजा वा उपासना करणार नाही व त्याच्या भक्तांचा कोठलाही पंथ असणार नाही असा त्याला शाप मिळाला. येथे आपणास एक गोष्ट नमूद करणे महत्त्वाचे ठरेल व ती गोष्ट अशी की, भारतात क्वचितच ब्रह्मदेवाची मंदिरे आढळतात. भारतातील हाताच्या बोटावर मोजण्या इतकी ब्रह्मदेवाची काही मंदिरे पुढीलप्रमाणे आहेत - राजस्थानातील अजमेर जिल्ह्यातील पुष्कर येथील ब्रह्मदेवाचे मंदिर, बंगलोर येथील ब्रह्मदेवाचे मंदिर (ह्या मंदिरातील ब्रह्मदेवाची मूर्ती सातफूट एवढी उंच असून तिला चार मुखे आहेत वा ही मूर्ती चतुर्मुख आहे). गोव्यातील ब्रह्म करंमबोलीम् (Brahma Carambolim) ह्या गावातील ब्रह्मदेवाचे मंदिर. असो. असे मानले जाते की, स्वतः कृष्णदेखील ज्योतिर्लिंगाचा व शिवलिंगाचा सन्मान करत असे.

आपणास असे निदर्शनास येते की, महादेवाची पूजा मोठ्या प्रमाणात ज्योतिर्लिंगाच्या स्वरूपात केली जाते. त्याचप्रमाणे महादेवाची मूर्ती वा प्रतिमा स्थापन करून देखील त्याची पूजा केली जाते. हिंदू धर्मियांची अशी निस्सीम श्रद्धा आहे की, भारतातील बारा ज्योतिर्लिंगे फार महत्त्वाची आहेत. ही बारा ज्योतिर्लिंगे व त्यांचे भारतातील स्थान पुढीलप्रमाणे आहे - गुजराथमधील सौराष्ट्रातील गीर, सोमनाथ जिल्ह्यातील सोमनाथ, आंध्र प्रदेशातील श्री शैलम् येथील मल्लिकार्जुन, मध्य प्रदेशातील उज्जैन येथील महाकालेश्वर, मध्य प्रदेशातीलच नर्मदा नदीच्या तीरावरील खांडवा जिल्ह्यातील ओंमकारेश्वर (परमेश्वर), हिमालयातील केदारनाथ (गढवाल हिमालय), महाराष्ट्र-पुण्यामधील

सह्य पर्वतातील भीमाशंकर, उत्तर प्रदेशातील वाराणसी (काशी) येथील विश्वेश्वरनाथ, महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील गोदावरीच्या उगमस्थानानजीकचे त्र्यंबकेश्वर, सध्याच्या झारखंड राज्यातील वैद्यनाथ वा बाबा बैद्यनाथ, दारूण वनातील नागेश्वर ज्योतिर्लिंग (ह्या ज्योतिर्लिंगाच्या नेमक्या ठिकाणाविषयी वा स्थळाविषयी एकमत नाही. ह्याबाबतची चर्चा आपण नंतर करणारच आहोत), तमिळनाडूतील रामेश्वरम् येथील रामेश्वर व महाराष्ट्रातील औरंगाबाद जिल्ह्यातील घृष्णेश्वर अशी ही भारतातील विविध भागांत असलेली बारा ज्योतिर्लिंगे आहेत. ही ज्योतिर्लिंगे स्वयंभू आहेत अशी हिंदूंची व प्रामुख्याने 'शैव' पंथीयांची धारणा आहे. तसेच श्रद्धाळू हिंदू असे मानतात की, ही बारा ज्योतिर्लिंगे जेव्हा महादेवाच्या तेजस्वी प्रकाशमान ज्योतिर्लिंगाचा स्तंभ (अग्निस्तंभ) अवतरला तेव्हापासून अस्तित्वात आहेत. असे म्हटले जाते की, मूळात चौसष्ट ज्योतिर्लिंगे होती.

सोमनाथ येथील शिवमंदिर तर जगप्रसिद्धच आहे व येथील ज्योतिर्लिंग (गुजराथमधील सौराष्ट्रातील गीर सोमनाथ जिल्हा) हे वर नमूद केल्याप्रमाणे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक आहे. येथील मंदिर अनेक परकीय आक्रमणांचे साक्षीदार आहे. अफगाणिस्तानातील गझनी येथील महमूद गझनीने इसवी सन १००० पासून साधारणतः १०२७ पर्यंत सतरा वेळा भारतावर आक्रमण केले. १०२७ मध्ये महमूद गझनीने सोमनाथ मंदिरावर हल्ला केला. हिंदूंनी गझनीच्या आक्रमणापासून सोमनाथ येथील मंदिराचे व ज्योतिर्लिंगाचे संरक्षण करण्याचे प्रयत्न केले. येथे हिंदू व महमूद गझनीच्या सैन्याची लढाई तीन दिवस चालू होती. परंतु शेवटी हिंदूंचा पराभव झाला व त्यानंतर महमूद गझनीने ह्या मंदिराची लूट केली.

महादेवाशी निगडित असे अजून एक ज्योतिर्लिंगाचे मंदिर म्हणजे वाराणसी येथील काशी विश्वनाथ मंदिर होय. आपणास ठाऊकच आहे की, वाराणसी हे शहर सध्याच्या उत्तर प्रदेश ह्या राज्यातील असून वाराणसीला बनारस असे देखील म्हटले जाते. ह्या ठिकाणाचा प्राचीन काळापासून हिंदू धर्मग्रंथांमध्ये 'काशी' असा उल्लेख आलेला आहे. हे ठिकाण हिंदू धर्मियांच्या दृष्टीने अतिशय पवित्र असून येथे गंगेत स्नान केल्यावर मनुष्याची सर्व पापे धुऊन जातात असे हिंदू भाविक म्हणतात. एवढेच नव्हे, तर काशीत मृत्यू आल्यास मोक्षप्राप्ती होते असे अनेक हिंदू मानतात. काशी हे जगातील सर्वात जुन्या शहरांपैकी एक असून हिंदू असे मानतात की, काशी हे शहर गेल्या पाच हजार वर्षांपासून अस्तित्वात असून तेव्हापासून येथे मानवाची वस्ती आहे. परंतु काही अभ्यासक म्हणतात की, काशी हे शहर तीन हजार वर्षांपूर्वीपासून अस्तित्वात आहे. येथे एक बाब अधोरेखीत होते व ती ही की, काशी हे खूप प्राचीन शहर असून भारताच्या सांस्कृतिक व धार्मिक जडण घडणीत ह्या शहराचे योगदान फार मोठे आहे. कारण गेल्या हजारो वर्षांपासून हे हिंदू धर्मियांचे व प्रामुख्याने 'शैव' पंथीयांचे फार मोठे धार्मिक केंद्र आहे. काशीमध्ये गंगेच्या पश्चिम तीरावर विश्वनाथाचे (महादेवाचे) मंदिर असून येथे बारा ज्योतिर्लिंगापैकी एक ज्योतिर्लिंग आहे. ह्या मंदिराची अनेक आक्रमकांनी वाताहत केल्याचे आपल्या निदर्शनास येते. औरंगजेबाने देखील ह्या मंदिराची नासधूस केली होती असे संदर्भ आपणास मिळतात. काशी विश्वनाथाच्या ह्या मंदिराचा जीर्णोद्धार इंदौरच्या होळकर घराण्यातील पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांनी १७८० केला होता अशी माहिती आपणास मिळते. १९८३ पासून ह्या ज्योतिर्लिंग स्थित जगप्रसिद्ध शिवमंदिराची व्यवस्था उत्तर प्रदेशचे राज्य सरकार पाहत आहे. काशीचे उल्लेख पुराणांमध्ये आलेले असल्याचे आढळते. आदि शंकराचार्यांपासून अनेक संतांनी व महान साधुपुरुषांनी काशीला भेट दिल्याची माहिती आपणास मिळते. हिंदूंची अशी श्रद्धा आहे की, भगवान

भविष्याबद्दल सांगणारा उत्तम ज्योतिषी म्हणजे गतकाल. - बायरन

शिवाचा वा महादेवाचा काशीमध्ये कायम स्वरूपी वास असतो. अशीही मान्यता आहे की, महादेवाने प्रलय आणल्यानंतर संपूर्ण सृष्टी व विश्व नष्ट पावते, परंतु काशी शहर नष्ट होत नाही. कारण येथे साक्षात भगवान शिवाचा कायमस्वरूपी वास असतो व प्रलय काळात भगवान शिव आपल्या त्रिशूलाच्या टोकावर काशी शहराला उचलून धरतात. (काशीच्या धार्मिक महात्म्याबाबतच्या अजून विस्तृत माहितीसाठी वाचकांनी प्रस्तृत लेखकाचा 'दिशा' मधील 'काशी के कंकर-शिवशंकर' हा लेख वाचावा.)

महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथे देखील बारा ज्योतिर्लिंगापैकी एक ज्योतिर्लिंग आहे. त्र्यंबकेश्वर येथील मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे येथे तीन शिवलिंगे असून ही शिवलिंगे ब्रह्म, विष्णू व महेश यांचे प्रतिनिधित्व करतात. याचाच अर्थ भगवान शिवामध्येच ब्रह्म व भगवान विष्णू सामावलेले आहेत असा देखील काढता येऊ शकतो. त्र्यंबकेश्वर येथे दर बारा वर्षांनी सिंहस्थ कुंभमेळा भरत असतो. त्र्यंबकेश्वर येथील सध्याचे शिवमंदिर पेशवे बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे (१७५५-१७८६) यांनी बांधले अशी माहिती आपणास मिळते. त्र्यंबकेश्वर ह्या ठिकाणाचा उल्लेख पुराणांमध्ये आलेला आहे. त्र्यंबकेश्वराबाबतच्या दोन कथा पुराणांमध्ये फार प्रसिद्ध आहेत. ह्या कथा पुढीलप्रमाणे आहेत - जेव्हा देव व आसुरांनी समुद्रमंथन केले व त्यातून अमृत मिळाले तेव्हा देव अमृताचा कुंभ घेऊन पळत असताना त्यातील काही थेंब पृथ्वीवर चार ठिकाणी पडले व ही चार ठिकाणे म्हणजे उज्जैन (मध्य प्रदेश), हरद्वार (उत्तराखंड), प्रयाग (उत्तर प्रदेश-सध्याचे अलाहाबाद) व त्र्यंबकेश्वर (महाराष्ट्र-नाशिक) ही होत. त्यामुळेच ह्या चारही ठिकाणी दर बारा वर्षांनी सिंहस्थ कुंभमेळा भरत असतो. त्र्यंबकेश्वर येथे सिंहस्थ कुंभमेळ्यादरम्यान संपूर्ण भारतातून अनेक श्रद्धाळू हिंदू व साधुसंत गोदावरीत पवित्र स्नान करण्यासाठी येत असतात.

त्र्यंबकेश्वराविषयीची अजून एक पौराणिक कथा अशी की, येथे गौतम ऋषींचा आश्रम होता व याठिकाणी एकदा खूप मोठा दुष्काळ पडला तेव्हा गौतम ऋषींनी वरुणाची (पर्जन्य देवता) आराधना व उपासना केली. त्यामुळे वरुणाने येथे चांगली पर्जन्यवृष्टी केली. यानंतर इतर ऋषींना गौतम ऋषींचा हेवा वाटला व त्यांनी त्यांच्यासोबत छल करून त्यांच्याकडून मोठे पापकृत्य घडवून आणण्याचे व पुन्हा एकदा त्यांच्या आश्रमाच्या परिसरात अवर्षणसदृश्य स्थिती निर्माण करण्याचे योजिले. त्यानुसार ह्या इतर ऋषींनी गौतम ऋषींच्या आश्रमाजवळ एक गाय सोडली व ती तेथील शेतांमध्ये चरू लागली. तेव्हा गौतम ऋषी त्या गाईला तेथून घालवून देण्याचा प्रयत्न करत असताना तिला इजा झाली व ती मरण पावली. त्यामुळे गौतम ऋषींना गोहत्या केल्याचे पाप लागले. आपल्या हातून गोहत्येचे पाप घडल्यामुळे गौतम ऋषींनी भगवान शिवाची आराधना करून खडतर तपश्चर्या केली व भगवान शिव त्यांना प्रसन्न झाले. तेव्हा गौतम ऋषींनी महादेवाजवळ माता पार्वतीसह त्र्यंबकेश्वर येथेच वास करण्याची इच्छा व्यक्त केली. तसेच तेथे गंगा नदीला आणण्यास सांगितले. त्यानुसार भगवान शिवाने गंगेला त्र्यंबकेश्वर येथे आणले व ती गोदावरी या नावाने प्रसिद्ध झाली. गोदावरी ही भारत वर्षातील अनेक पवित्र नद्यांपैकी एक नदी असून ती दख्खन व दक्षिण भारतातील सर्वात मोठी नदी होय.

बारा ज्योतिर्लिंगांपैकी अजून एक ज्योतिर्लिंग म्हणजे वैद्यनाथ हे ज्योतिर्लिंग होय. ह्या ज्योतिर्लिंगाच्या स्थानावरून वाद आहेत. काहीजण असे मानतात की, वैद्यनाथचे ज्योतिर्लिंग भारतातील सध्याच्या झारखंड राज्यातील देवगड या जिल्ह्यात आहे. ह्या जिल्ह्याच्या उत्तरेला बिहार हे राज्य आहे. येथील मंदिराला 'बाबा

वैद्यनाथ मंदिर' असे देखील म्हटले जाते. असे म्हणतात की, रावणाने येथे भगवान शिवाची आराधना केली होती. अशी आख्यायिका सांगितली जाते की, रावणाने महादेवाला प्रसन्न करण्यासाठी आपली दहा शिरे धडा वेगळी करून वाहिली होती. त्यामुळे त्याच्या तपश्चर्येवर प्रसन्न होऊन महादेव तेथे अवतीर्ण झाले व त्यांनी वैद्याप्रमाणे (भारतातील आयुर्वेदिक या उपचार पद्धतीप्रमाणे रोगांचे निवारण करणाऱ्या व्यक्तींना वैद्य असे म्हटले जाते.) रावणाच्या जखमा बऱ्या केल्या. या आख्यायिकेमुळे देखील येथील ज्योतिर्लिंगाला 'वैद्यनाथ ज्योतिर्लिंग' असे म्हटले जाते. काही लोक असे मानतात की, हे ज्योतिर्लिंग महाराष्ट्रातील मराठवाडा विभागात बीड जिल्ह्यातील परळी येथे आहे व येथील ज्योतिर्लिंग मंदिराला 'परळी वैजनाथाचे मंदिर' म्हणतात. काही हिंदू असे मानतात की, वैद्यनाथ हे ज्योतिर्लिंग हिमाचल प्रदेश या राज्यातील कांगडा या जिल्ह्यात असून ते 'बैजनाथ' या नावाने प्रसिद्ध आहे. वाचकांना येथे अजून एक माहिती द्यावीशी वाटते व ती अशी की, हे ठिकाण धर्मशाला (हिमाचल प्रदेश या राज्याच्या शीतकालीन – हिवाळ्यातील राजधानीचे ठिकाण होय) पासून साधारणतः ५० किलोमीटर एवढ्या अंतरावर आहे. तिबेटमधील बौद्ध लोकांचे आध्यात्मिक गुरू व एका अर्थाने तिबेटी जनतेचे नेते दलाई लामा यांचे निवासस्थान देखील धर्मशाला येथे आहे. आपणा सर्वांना माहीतच आहे की, आपल्या शेजारील राष्ट्र चीननें १९६२ च्या युद्धात भारताच्या काश्मीर (लडाख) व अरुणाचल प्रदेश या राज्यांतील बराचसा प्रदेश गिळंकृत केला. त्याअगोदर चीननें १९५० च्या आसपास तिबेटवर देखील हल्ला केला व हा प्रदेश बेकायदेशीररीत्या ताब्यात घेतला. यानंतर साधारणतः १९५९ साली तेथे झालेल्या उठावामुळे व चीनच्या कृत्यांमुळे दलाई लामांना आपल्या अनुयायांसह तिबेट सोडावा लागला व त्यांनी भारतातील हिमाचल प्रदेश या राज्यातील धर्मशाला येथे आश्रय घेतला. १९५९ चा हा उद्रेक म्हणजे तिबेटियन लोकांनी चीनच्या सैन्याविरुद्ध दिलेला लढा होय. असो. येथील शिवमंदिर इसवी सनाच्या तेराव्या शतकात बांधलेले असल्याचे अभ्यासकांचे मत आहे. ह्या बैजनाथ मंदिराविषयी वा शिव मंदिराविषयी अजून एक आख्यायिका वा कथा सांगितली जाते व ती अशी की, त्रेतायुगामध्ये रावणाने भगवान शिवाला प्रसन्न करून घेण्यासाठी व अमरत्वाचे वरदान मिळवण्यासाठी खडतर तपश्चर्या केली व भगवान शिवाने प्रसन्न होऊन त्याला अमरत्वाचे वरदान दिले. शिवाची आराधना करत असताना रावणाने आपल्या दहा शिरांची आहुती दिली होती असे या कथेत सांगितले आहे. भगवान शिव प्रसन्न झाल्यानंतर रावणाने त्यांना विनंती केली की, भगवान शिवाने रावणासोबत लंकेला यावे. तेव्हा महादेव रावणाला म्हणाले की, ते ज्योतिर्लिंगाच्या स्वरूपात त्याच्या सोबत लंकेला येतील. मात्र, भगवान शिवाने अशी देखील अट घातली की, रावणाने हे ज्योतिर्लिंग लंकेकडे मार्गक्रमण करत असताना रस्त्यात कुठेही खाली भूमीवर ठेवू नये अन्यथा रावण ज्याठिकाणी ज्योतिर्लिंग वा शिवलिंग जमिनीवर खाली ठेवेल तेथेच महादेव शिवलिंगाच्या वा ज्योतिर्लिंगाच्या स्वरूपात स्थित होतील. रावणाने ही अट मान्य केली व तो शिवलिंग घेऊन कैलासापासून लंकेकडे जाऊ लागला. परंतु त्याला रस्त्यात तहान लागली व त्याला मेंढपाळाच्या रूपातील भगवान गणेश दिसला. त्या मेंढपाळरूपी गणेशाने रावणाला पिण्यासाठी जल दिले व ते पाणी प्यायल्यानंतर रावणाला लघवीला लागल्यामुळे त्याने आपल्या हातातील शिवलिंग गणेशाकडे दिले. गणेशाने ते शिवलिंग जमिनीवर ठेवले व त्या ठिकाणीच हिमाचल प्रदेशातील बैजनाथाचे ज्योतिर्लिंग स्वरूप शिवमंदिर आहे असे काही लोक मानतात.

शिवपुराणात उल्लेख आलेले अजून एक

जुलमी राज्यकर्त्यांची गुलामगिरी ही विकारांच्या गुलामगिरीपेक्षा पुष्कळ बरी. – पायथागोरस

ज्योतिर्लिंग म्हणजे नागेश वा नागेश्वर ज्योतिर्लिंग हे होय. शिवपुराणात असे म्हटले आहे की, हे ज्योतिर्लिंग दारुका वनात होते. ह्या ज्योतिर्लिंगाच्या नेमक्या ठिकाणावरून देखील दुमत असल्याचे जाणवते. काहीजण म्हणतात की, हे ज्योतिर्लिंग सध्याच्या उत्तराखंड या राज्यातील अलमोडा या जिल्ह्यात आहे व येथील मंदिराला 'जागेश्वर मंदिर' म्हटले जाते. येथील मंदिर देखील फार पुरातन आहे अशी धारणा आहे. काहीजण हे मंदिर इसवी सनाच्या सातव्या ते बाराव्या शतकादरम्यान बांधले गेले असावे असे मानतात, तर काहीजण हे मंदिर चौदाशे वर्षे जुने असावे असे म्हणतात. काही भक्तगण असे मानतात की, नागेशाचे ज्योतिर्लिंग हे महाराष्ट्रातील मराठवाडा भागातील हिंगोली जिल्ह्यात औंढा नागनाथ येथे आहे. येथील शिवमंदिर तेराव्या शतकात महाराष्ट्रावर राज्य करणाऱ्या यादव वंशीय राजांनी बांधले असल्याची माहिती आपणास मिळते. या मंदिराविषयी अशी अख्यायिका सांगितली जाते की, हे मंदिर महाभारताच्या काळात जेव्हा पांडवांना १४ वर्षांचा वनवास झाला होता तेव्हा वनवासात असताना युधिष्ठिराने बांधले होते. औरंगजेबाने या मंदिराची नासधूस केली होती अशी देखील माहिती आपल्याला मिळते. औंढा नागनाथाचे मंदिर हेमाडपंथी पद्धतीने बांधले आहे. भक्तगण असे मानतात की, संत नामदेव व संत ज्ञानेश्वर यांच्याशी देखील हे मंदिर निगडित आहे. अशी मान्यता आहे की, संत नामदेव हे आपले गुरू विसोबा खेकर (खेचर) यांना येथेच भेटले होते.

तमिळनाडू राज्यातील रामेश्वरम् येथे एक ज्योतिर्लिंग आहे. येथील शिवलिंगाविषयीची हिंदू धर्मग्रंथांमधील कथा अशी की, भगवान विष्णूचा सातवा अवतार श्रीरामाने सीतामातेला रावणाच्या तावडीतून सोडविण्यासाठी रावणाचा वध केला. परंतु रावण हा जन्माने ब्राह्मण असल्यामुळे त्याचा वध केल्यावर रामाला ब्रह्महत्येचे पातक लागले. या पापातून मुक्त होण्यासाठी राम महादेवाची आराधना करण्याचे ठरवितो व हनुमानाला हिमालयातून शिवलिंग आणण्यास सांगतो. हनुमानाला परत येण्यास उशीर झाल्याने सीता मातेने रामेश्वरला वाळूपासून शिवलिंग निर्माण केले व रामाने भक्तीभावाने या शिवलिंगाची पूजा केली व तो ब्रह्महत्येच्या पापातून मुक्त झाला. येथील हे ज्योतिर्लिंग साक्षात रामाने पूजलेलेच ज्योतिर्लिंग असल्याची भक्तांची भावना आहे. अनेक हिंदू भक्तीभावाने 'चारधाम यात्रा' करत असतात. या यात्रेत भक्तगण बदरीनाथ (हिमालय-उत्तराखंड), द्वारका (गुजरात), पुरी (ओडिशा) व रामेश्वरम् (तमिळनाडू) या चार धामांना जात असतात. येथे अजून एक बाब नमूद कराविशी वाटते व ती म्हणजे - हिमालयातील 'चारधाम यात्रा' (ह्या यात्रेस 'छोटा चारधाम' असे देखील म्हटले जाते) प्रसिद्ध आहे व ह्या यात्रे दरम्यान भाविक केदारनाथ, बदरीनाथ, यमुनोत्री व गंगोत्री या पवित्र ठिकाणांना भेटी देतात. हिंदूंमध्ये अशीही श्रद्धा आहे की, काशी यात्रा केल्यास काशीहून रामेश्वरला जावे व तेव्हाच खऱ्या अर्थाने काशीची यात्रा पूर्ण होते.

महाराष्ट्रातील मराठवाडा विभागात औरंगाबाद ह्या जिल्ह्यातदेखील बारा ज्योतिर्लिंगापैकी एक ज्योतिर्लिंग आहे. औरंगाबाद येथील ज्योतिर्लिंग घृष्णेश्वर या नावाने प्रसिद्ध आहे. घृष्णेश्वर मंदिर जगप्रसिद्ध एलोरा (वेरूळ) लेण्यांपासून जवळ आहे. येथील मंदिराची इसवी सनाच्या १३ व्या व १४ व्या शतकांत दिल्लीच्या सुलतानशाहीच्या काळात नासधूस झाली होती अशी माहिती आपणास मिळते व येथील सध्याच्या मंदिराचे निर्माण वा जीर्णोद्धार इंदौर येथील होळकर घराण्यातील पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी औरंगजेबाच्या मृत्यू पश्चात केला होता अशी माहिती आपणास मिळते. अहिल्याबाईंनी काशी येथील विश्वनाथ मंदिराचा,

उत्कृष्ट पक्वान्नाप्रमाणे उत्कृष्ट चित्र असते. त्याची चव घेता येते, पण वर्णन करता येत नाही. - व्लॅर्मिक

गुजराथमधील सोमनाथ मंदिराचा, तसेच गया येथील विष्णू मंदिराचा देखील जीर्णोद्धार केला होता असे आपल्या निदर्शनास येते.

हिंदू धर्मीय भाविकांची आपल्या आयुष्यात एकदा तरी ह्या बारा ज्योतिर्लिंगाची यात्रा करण्याची इच्छा असते. बारा ज्योतिर्लिंगांचे दर्शन केल्यावर मनुष्य जन्मातील सर्व पापे धुऊन जाऊन मोक्षप्राप्ती होते असे अनेक भाविक मानतात. आपण ह्या बारा ज्योतिर्लिंगांच्या भौगोलिक स्थानाविषयी बारकाईने विचार केल्यास असे लक्षात येते की, ही स्थाने उत्तर, मध्य, पश्चिम, पूर्व व दक्षिण भारतात व एकंदरीत सर्व दिशांना आहेत. वर्षानुवर्षे नव्हे, शतकानुशतके अनेक भाविक भारताच्या विविध भागांतून ह्या बारा ज्योतिर्लिंगांचे दर्शन घेण्यासाठी येतात. येथे लोक आपले प्रादेशिक व भाषिक भेद पूर्णपणे विसरून जातात व शिवभक्तीत तल्लीन होतात. हेच भारताचे खऱ्या अर्थाने सांस्कृतिक ऐक्य होय यात काही वाद नाही.

आपण आपल्या ठाणे जिल्ह्याचा विचार केल्यास वा अभ्यास केल्यास आपल्या असे निदर्शनास येते की, साधारणतः हजार ते बाराशे वर्षांपूर्वी ठाणे व उत्तर कोकणावर शिलाहार राजवंशाचे राज्य होते. ह्या राजघराण्याच्या तीन शाखा होत्या. एका शाखेचे राज्य वर नमूद केल्याप्रमाणे उत्तर कोकण, दुसऱ्या शाखेचे राज्य दक्षिण कोकणातील म्हणजेच गोवा, सिंधुदुर्ग, रत्नागिरी म्हणजेच सप्तकोकण व तिसऱ्या शाखेचे राज्य दक्षिण महाराष्ट्रातील कोल्हापूर, सातारा, सांगली व उत्तर कर्नाटकातील बेळगाव ह्या जिल्ह्यांवर होते. ह्या तीनही शाखा विद्याधराधिपती जीमूतवाहन याच्या वंशापासून निर्माण झाल्या वा उत्पन्न झाल्या असे म्हटले जाते. ह्या जीमूतवाहनाची कथा हिंदू धर्म ग्रंथांमध्ये पुढीलप्रमाणे वर्णिलेली आहे. गरुडाने एकदा वासुकीला (महादेवाच्या गळ्यातील सर्प-नाग समुद्रमंथनाच्यावेळी वासुकीचा देवांनी व आसुरांनी दोरखंड म्हणून वापर केला होता अशी कथा आहे) त्याचे सर्व प्रजाजन म्हणजे सर्पांना बळी देण्यास भाग पाडले. कालांतराने शंखचूड नावाच्या सर्पावर गरुडाचे भक्ष्य बनण्याची वेळ आली व तो शिळेवर (मोठ्या खडकावर) जाऊन बसला. तेव्हा जीमूतवाहनाला शंखचूड सर्पाची दया आली व त्याचे प्राण वाचविण्यासाठी जीमूतवाहन शंखचूडाच्या जागी स्वतः गरुडाचे भक्ष्य होण्यासाठी शिळेवर जाऊन बसला. गरुडानेदेखील त्यालाच शंखचूड म्हणून त्याचे भक्षण करण्यास सुरुवात केली व त्याला थोड्यावेळाने आपली चूक लक्षात आली. तेव्हा गरुडाने जीमूतवाहनाला खाण्याचे थांबविले. त्यानंतर जीमूतवाहनाच्या पत्नीने प्रार्थना केल्यावर माता पार्वतीने त्याला पुन्हा जीवंत केले व गरुडाने तेव्हापासून सर्पांना खाणे सोडून दिले. त्यामुळेच जीमूतवाहनाच्या वंशाला शिळेवरील वा शिलेवरील आहार ह्या पार्श्वभूमीवर 'शिलाहार' असे नाव मिळाले, अशी ही कथा आहे. काही ठिकाणी मीलार हा ह्या वंशाचा मूळपुरुष असल्याची माहिती मिळते. ह्या मीलाराने परशुरामाच्या बाणांच्या वर्षावामुळे त्रस्त झालेल्या समुद्राचे रक्षण केल्याची कथा सांगितली जाते. ह्या राजांनी तंगापुर-परमेश्वर, तगरपुरवराधीश्वर अशी विशेषणे वा बिरुदे घेतलेली असल्याचे आढळते. अभ्यासकांचे असे मत आहे की, शिलाहार हे कन्नडभाषी होते. शिलाहार पूर्वी राष्ट्रकूटांचे मांडलिक होते अशी माहिती मिळते व आठव्या शतकातील कपर्दी ह्याच्यापासून उत्तर कोकणच्या शिलाहार वंशाची सुरुवात साधारणतः इसवी सनाच्या ८ व्या शतकात झाली असावी असे अभ्यासक म्हणतात. शिलाहार राजवंशाचा येथे उल्लेख करण्याचा उद्देश असा की, यांचे आपल्या ठाण्यावर राज्य होते व ठाणे म्हणजेच तेव्हाचे 'श्रीस्थानक' ही त्यांची राजधानी होती असे अभ्यासक म्हणतात. शिलाहार राजांनी विद्या व कलेस आश्रय देऊन अनेक मंदिरांची निर्मिती केली होती. शिलाहार राजा झंझ (इ.स. ९१०-९३०) याने तर एकूण बारा शिवमंदिरे

चित्रकला महणजे मूक काव्य आणि काव्य म्हणजे वाचा असलेली चित्रकला. - सिमोनाइड्स

बांधली होती अशी माहिती मिळते. यावरून शिलाहार राजे भगवान शिवाचे उपासक होते असे सिद्ध होते. शिलाहारांनी अंबरनाथ (ठाणे), वाळकेश्वर (मुंबई) व उत्तरेश्वर (अभ्यासकांचे मत आहे की, हे मंदिर ठाण्यातील सध्याच्या उथळसर ह्या भागात असावे) ठाणे येथील शिवमंदिराची निर्मिती केली अशी माहिती काही स्तोत्रांतून मिळते. यातील अंबरनाथ येथील शिवमंदिराची निर्मिती साधारणतः इ.स. १०६० मध्ये झाली अशी माहिती काही अभ्यासक देतात. हे भूमिज प्रकारातील मंदिर असून ते वालधुनी नदीच्या तीरावर बांधलेले आहे. वालधुनी नदीचा उगम अंबरनाथमधील काकोले गावाजवळच्या टेकड्यांमध्ये होतो. तज्ज्ञांचे असे मत आहे की, या मंदिराच्या शिखराचे काम शेवटपर्यंत पूर्ण झालेले नसावे.

कौपिनेश्वर शिवमंदिर हे ठाणे शहरात असून येथील शिवलिंग हे महाराष्ट्रातील सर्वात मोठे शिवलिंग असल्याचे काही लोकांचे मत आहे. आपणास काही स्तोत्रांतून अशी माहिती मिळते की, कौपिनेश्वर मंदिर हे प्राचीन नसून ह्या मंदिराच्या आवारातील जी उत्तरेश्वराची शिवपिंडी आहे ती शिलाहार कालीन आहे. आपणास डॉ. दाऊद दळवी यांच्या 'असे घडले ठाणे' या पुस्तकात अशी माहिती मिळते की, मासुंदा तलावाच्या अवती-भवती शिलाहारकालीन कमीत कमी बारा मंदिरे होती. पोर्तुगिजांनी ठाण्याचा परिसर ताब्यात घेतल्यावर त्यांनी ह्या मंदिरांची तोडफोड केल्याचे डॉ. दाऊद दळवी सरांनी नमूद केले आहे. उत्तरेश्वराचे (शिव मंदिर) हे शिलाहारकालीन होते व ते सध्याच्या उथळसर भागात असावे असा अभ्यासकांचा कयास आहे. सोमेश्वर ह्या शिलाहार नृपतीने उरण येथील चांजे ह्या ठिकाणाहून ठाणे येथील उत्तरेश्वराला दान दिल्याचा शिलालेख सापडला आहे. कौपिनेश्वर मंदिरातील सध्याचे शिवलिंग हे मासुंदा तलावात सापडले होते. हे शिवलिंग महाराष्ट्रातील सर्वात मोठे शिवलिंग असून त्याची उंची ४ फूट व घेर १२ फूटांचा आहे. कौपिनेश्वराचे सध्याचे मंदिर पेशव्यांचे सरदार / सुभेदार बिवलकरांनी १७६० साली बांधले असे अभ्यासकांचे मत आहे. १७६० साली बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब हे पेशवे होते. बिवलकरांनी अनेक मंदिरे बांधली व बऱ्याच मंदिरांचा जीर्णोद्धार केला अशी माहिती मिळते. श्री कौपिनेश्वर मंदिरातील पूजा करण्यासाठीची सनद पेशव्यांनी बापू फाटक यांना दिली असावी असा अभ्यासकांचा कयास आहे. याच कुटुंबातील पुरुषोत्तम विष्णू फाटक यांच्या मृत्यूनंतर ती परत घेतल्याचे उल्लेख आढळले आहेत. आपणास मोरेश्वर कुंटे व विजया कुंटे लिखित 'देव दर्शन ठाणे' ह्या पुस्तकात अशी माहिती मिळते की, पेढे परशुराम, ता. चिपळूण येथील मूळ रहिवासी असलेले वत्स गोत्रातील श्री गंगाधर नारायण जोशी हे चिमाजी आप्पांच्या काळात ठाण्यात आले व यांचे मूळ आडनाव काळे होते. तर ह्या जोशींना येथील ग्रामजोशीपण मिळाले व ह्यांचाच महत्त्वाच्या वेळी कौपिनेश्वराची पूजा करण्याचा मान होता अशी माहिती 'देव दर्शन ठाणे' ह्या ग्रंथात मिळते. हे कुटुंब चरई भागात राहत असे व यांचे कुलदैवत श्री हरिहरेश्वर येथील काळभैरव व आंबेजोगाईची देवी होती अशी माहिती मिळते. कौपिनेश्वर मंदिराच्या आवारात शितळामाता, पंचमुखी परमेश्वर (शंकर), श्रीराम, श्री कालिका, दक्षिणाभिमुख मारुती इत्यादी देवळे आहेत.

वाळकेश्वर हे शिवमंदिर मुंबईतील मलबार टेकडीवर आहे. या मंदिराविषयी अशी आख्यायिका सांगितली जाते की, राम वनवासाच्या काळात सीतामातेच्या शोधात (रावणाने सीतेचे हरण केल्यावर) भटकत असताना येथे आला होता व या ठिकाणी त्याला भगवान शिवाची आराधना करण्यास सांगितल्यावर त्याने वाळूपासून शिवलिंग निर्माण करून आपल्या बाणाने येथे गंगा

जो मनाने आणि वृत्तीने अलिप्त राहू शकतो, तो स्वर्गातच वास करत असतो. - ब्यूमाँट आणि फ्लेचर

नदीला अवतीर्ण केले व त्याने त्या पाण्याने शिवलिंगाचा अभिषेक केला व ते जल प्राशनदेखील केले. रामाने बाण मारून गंगेला अवतीर्ण होण्यास भाग पाडले म्हणून तिचे येथे 'बाणगंगा' हे नाव पडले अशी लोकांची श्रद्धा आहे. रामाने येथील शिवलिंग वाळूपासून निर्माण केल्यामुळे येथील शिवलिंगाला 'वाळकेश्वर' असे नाव पडले अशी कथा सांगितली जाते. मात्र, इतिहासाचा अभ्यास केल्यावर आख्यायिका व कथा बाजूला सारून वाळकेश्वर मंदिराचे निर्माण उत्तर कोकणच्या शिलाहार राजांनी केले अशी माहिति आपणास काही स्रोतांतून मिळते. पोर्तुगिजांनी ह्या मंदिराची नासधूस केल्याचे निदर्शनास येते व कोकणातील गौड सारस्वत ब्राह्मणांनी या मंदिराचा जिर्णोद्धार केला असल्याचे या समाजाचे म्हणणे आहे. आजही शिवभक्त मोठ्या प्रमाणात अंबरनाथच्या शिवमंदिरात, ठाण्यातील कौपिनेश्वर मंदिरात व मुंबईतील वाळकेश्वर मंदिरात दर्शनासाठी जात असतात. ९५८ वर्षांपासून भाविक अंबरनाथच्या मंदिरात भक्तीभावाने येत आहेत. आपल्या भारतात एवढी पुरातन मंदिरे व वास्तू आहेत याचा आपल्याला रास्त अभिमान असायला पाहिजे. हाच आपला खरा सांस्कृतिक वारसा आहे. ठाणेकरांना तर आपण एवढ्या जुन्या शिवालये असलेल्या ठिकाणांजवळ राहत आहोत (१ ते १५ कि.मी. अंतरावर) यामुळे आनंद व अभिमान वाटला पाहिजे.

आपल्या ठाणे-मुंबईच्या जवळच अरबीसमुद्रातील घारापुरी येथील लेणी व तेथील शिवाची शिल्पे जगप्रसिद्ध आहेत. इंग्रजीमध्ये घारापुरीला एलिफंटा केव्हज् (Elephanta Caves) असे म्हटले जाते. अभ्यासक असे मानतात की, साधारणतः इसवी सनापूर्वीच्या दुसऱ्या शतकापासून ह्या बेटावर मानवी वस्ती असावी. येथील लेणी व शिल्पे बेसॉल्टच्या (काळा पाषाण) खडकातून कोरलेली वा बनविलेली आहेत. येथे एका हत्तीचेदेखील शिल्प मिळालेले असल्याने आंग्ल व पोर्तुगिज लोकांनी ह्या ठिकाणाचा उल्लेख एलिफंटा असा केल्याची माहिति आपणास मिळते. येथील तीनमुखी - त्रिमूर्ती शिवाचे शिल्प जगप्रसिद्ध आहे. अभ्यासकांचे मत आहे की, ही तीन मुखे सदाशिव, नटराज व योगिश्वर ह्या शिवाच्या तीन स्वरूपांची प्रतिके होत. येथे काही ठिकाणी बौद्ध स्तूपे देखील असावीत असे काही अभ्यासकांचे मत आहे. तसेच घारापुरी येथे गंगावतरणाचे (गंगाधराचे) शिल्प, अर्धनारिश्वराचे शिल्प, शिवाने अंधकासुराचा वध केल्याचे शिल्प, शिवाच्या विवाहाचे शिल्प इत्यादी शिल्पे देखील आहेत. घारापुरी येथील लेण्यांची व शिल्पांची (शिवमूर्तींची) निर्मिती नेमकी कोणत्या राजवंशाच्या काळात झाली यावरून इतिहासकारांमध्ये दुमत आहे. काही अभ्यासकांचे मत आहे की, ह्या मानवी इतिहासातील अतिशय सुंदर लेण्यांचे व शिवमूर्तींचे निर्माण राष्ट्रकूटांच्या काळात झाले असावे, तर काहींचे असे मत आहे की, कलाचुरी नृपतींनी ह्यांचे निर्माण केले असावे. सध्या युनेस्कोनों (UNESCO) ह्या ठिकाणाला 'जागतिक वारसा' म्हणून जाहीर केले आहे व भारताचा पुरातत्त्व विभाग ह्या लेण्यांची व येथील शिल्पांची देखरेख करत असते.

महाराष्ट्रातील औरंगाबाद जिल्ह्यात असलेल्या एल्लोरा म्हणजेच वेरूळ येथील लेणी देखील जगप्रसिद्ध आहेत. येथील सोळाव्या क्रमांकाच्या लेणीमध्ये वा गुंफेमध्ये एका अखंड शिळेपासून (पाषाणापासून) कोरून बनविलेले कैलास मंदिर आहे. ह्या कैलास मंदिराचे निर्माण कैलास पर्वताच्या धर्तीवर केलेले असल्याचे अभ्यासकांचे मत आहे. येथे शिवलिंगासोबतच गंगा, यमुना, सरस्वती, विष्णुचे दहा अवतार (दशावतार), वेदातील इंद्र, अग्नी, वायू, सूर्य तसेच गणेश, अर्धनारिश्वर (शिव-पार्वती), हरिहर (शिव-विष्णू) अन्नपूर्णा, दुर्गामाता इत्यादी देवतांची शिल्पे कोरलेली आढळतात.

(पृष्ठ क्र.३० वर)

# ऋण मातृत्वाचे

*बहिणीने भावासाठी केलेला त्याग या लेखात प्रगट केला आहे - संपादक*

सागर, मेघना व मनाली असं त्रिकोणी सुखवस्तू कुटुंब स्वतःच्या हुशारीने आणि मेहनतीने शहरात सेटल झालेलं. मनाली सात वर्षांची गोड मुलगी. व्हॅनमधून संध्याकाळी सोसायटीच्या गेटवर उतरल्यावर माय-लेकींच्या लाघवी गप्पा ऐकून सोसायटीतील साऱ्यांच्या मनात या कुटुंबाने घर निर्माण केलं होतं.

शुक्रवार आला की व्हॅनमधून उतरल्यावर मनालीची मामीकडे जाण्याची घाई. सागरही त्याचवेळेस येत असे. दोघींना सोडून तो परत घरी परतायचा. बॅचलर असल्यापासून शहरात राहिल्यामुळे घरची जबाबदारी व स्वयंपाक इ. ची चांगलीच जाण होती त्याला.

मामीची सोसायटी आली की मनाली धावत प्रियाच्या कुशीत आणि मग प्रेमाचा वर्षाव नेहमीचाच...

मनाली झाल्यापासून तिला सतत घरी आणण्याचा आग्रह प्रियाचाच. मनाली, मेघनाच्या येण्याने शामही खूश असायचा. प्रियाचे अश्रू व त्या विषयाला तात्पुरता विराम मिळायचा.

आजही नेहमीप्रमाणे मनालीची स्वारी मामा-मामींकडे आली व थोड्याच वेळात ती रियाकडे खेळायला गेली. मनाली जाताच मेघनाने शामकडे पाहिलं व नजरेने त्या प्रश्नाची शिरस्ती केली. त्याने नकारार्थी मान हलवली. प्रियाचा अश्रूंचा बांध फुटला व ती आतल्या खोलीत पळत गेली.

लग्नाला दहा वर्ष उलटून गेली तरी कूस रिकामी होती तिची. नामांकीत डॉक्टरांनीही नकार दर्शवला होता. काल शेवटचे म्हणत पुन्हा एका डॉक्टरकडे गेले होते. परंतु...

मनाली तिच्या घरी परतताना प्रियाचा चेहरा पार कोमेजून जायचा. त्यांना निरोप देऊन पुन्हा पुढच्या आठवड्याची ती वाट पाहात राहायची.

घरी आल्यावर आज मेघनाचे कशातही लक्ष नाही हे सागरच्या ध्यानात आले. मनालीला झोपवून तो हॉलमध्ये आला. मेघनाच्या डोळ्यांत पाणी पाहून त्याने तिला जवळ घेतले. ती त्याला बिलगली व अश्रूंच्या धारेत तिने भडाभडा सारं सारं मनातलं बोलून टाकलं. मेघनाला काय उत्तर द्यावं याचं धाडस सागरला होईना.

आज ऑफिसात सागरचे लक्ष नाही हे अजयने ओळखले. विषयाला हात घालण्याची त्याची हातोटीच. सागरकडून सारे कळल्यावर त्याच्याही तोंडून 'मेघना इज ग्रेट! सच अ ग्रेट!' असे उद्गार निघाले.

जीवलग मित्राच्या पाठिंब्याने सागरला धीर आला. घरी आल्यावर मेघनाच्या नजरेतील तोच प्रश्न त्याने ओळखला व होकारार्थी मान हलवली. दोघांच्या आत्मिक आनंदाला पारावार उरला नाही.

त्याच खुशीत ते शाम व प्रियाकडे आले. मेघनाने घेतलेल्या निर्णयासंबंधी त्या दोघांना सांगितले. ते ऐकून शामच्या डोळ्यांतून अश्रूंची धार लागली. प्रियाने तर मेघनाचे व सागरचे पाय पकडले. आज त्या घरातील प्रत्येकाचा आनंद शब्दात वर्णन करण्याजोगा नव्हता.

दोन महिने न उलटताच तोच मेघनाला दिवस गेले. प्रिया आता मेघनाकडे राहून तिची व मनालीची काळजी घेत होती. सातव्या महिन्यात ओटीभरणही थाटात केले. शाम व सागरने वकिलांकडे जाऊन आवश्यक

एक अग्नी दुसऱ्या अग्नीचे शमन करतो, त्याप्रमाणे दुसऱ्याच्या दुःखामुळे आपले दुःख कमी होते. - शेक्सपीअर

गोष्टींची पूर्तता केली होती. अखेर ज्या क्षणाची वाट पाहात होता तो दिवस आला.

मेघनाने एका गोंडस मुलाला जन्म दिला. नर्सने बाळाला प्रियाच्या कुशीत दिले तेव्हा शाम व प्रियाला स्वर्गसुख मिळाल्याचा अतीव आनंद झाला.

मामी बारीक म्हणून डॉक्टरांनी माझ्याकडे बाळ वाढवायला दिले अशी कहाणी नेहमीच ऐकल्याने मामीच्या कुशीत मामीचं बाळ पाहून मनालीही भलतीच खूश झाली.

बाळ प्रियाकडे चांगलंच सरावलं होतं. मेघनाने वरच्या दुधाचीही त्याला सवय केली होती. बाळाच्या लिलयेनं मेघनाचा पान्हा फुटायचा, पण तिने प्रियाला कधीही कळू दिले नाही. मनालीचे कारण सांगून मेघनाने घरी परतण्याचा निर्णय घेतला.

निघण्याच्या तयारीत असतानाही मेघनाचे पाय जड झाले होते. मोठ्या धीराने तिने तिच्या चेहऱ्यावर हसूच ठेवले होते. बॅग घेत असतानाच शामने मेघनासमोर चेक धरला. नकळतच त्याचे गुडघे जमिनीला टेकले व हात जोडले गेले. लहानग्या बहिणीच्या त्यागापुढे आपण छोटीशी भेट द्यावी हा एवढाच त्याचा हेतू.

मेघनाने तो चेक फाडला व इतका वेळ अडवलेला अश्रूंचा बांध फोडला. आपण आपल्या भाऊ व वहिनीसाठी काहीतरी केलं याचंच तिला आत्मिक समाधान होते.

ते तिघे गेल्यावर शाम व प्रियाने देवापुढे हात जोडले. आज कुणास ठाऊक दोघांनाही देवाच्या फोटोत मेघनाची छबी दिसत होती. अनंत उपकार मनात मानून दोघेही बाळाला खेळवण्यात दंग झाले...

**– सौ. सुरेखा संजय ठाणेकर**
डॉ. बेडेकर विद्यामंदिर,
प्राथमिक विभाग, ठाणे
भ्रमणध्वनी : ९८१९४०१६०४

(पृष्ठ क्र. २८ वरून – **'कैलासराणा शिवचंद्रमौळी'**)

काही अभ्यासक ह्या मंदिराचे निर्माण राष्ट्रकूट राजा पहिला कृष्ण (इ.स. ७५६ ते ७७३) याने केले असे म्हणतात. येथे दक्षिणेतील पल्लव राजवंशाच्या स्थापत्य कलेच्या खुणा देखील अभ्यासकांना आढळलेल्या आहेत. वेरूळ येथे अजूनही अनेक हिंदू देवदेवतांची व बौद्ध व जैन धर्मियांशी संबंधीत शिल्पे व लेणी आहेत. वेरुळच्या लेण्यांनादेखील युनेस्कोने 'जागतिक वारसा' म्हणून जाहीर केले आहे. (क्रमशः)

**संदर्भ :**

• इंडिया – अ सेक्रेड जॉग्रफी (इंग्रजी): डायना एल. येक. (इंग्रजी) सुधारीत आवृत्ती
• गॅझेअिअर ऑफ इंडिया – महाराष्ट्र स्टेट, ठाणे डिस्ट्रीक्ट
• भारतीय संस्कृती कोश – खंड ९ – संपादक पं. महादेवशास्त्री जोशी, सहसंपादक – तर्कतीर्थ सौ. पद्मजा होडारकर
• भक्तिकोश तृतीय खंड – भारतीय संप्रदाय विद्यावायस्पति शंकर वासुदेव अभ्यंकर
• शिवलिंग (इंग्रजी) : एन्. के. सिंग
• सेव्हन सिक्रेटस् ऑफ शिवा : देवदत्त पट्टनायक
• शिवा टू शंकर : देवदत्त पट्टनायक
• विश्वकोश–खंड १७ : प्रमुख संपादक विजया वाड
• असे घडले ठाणे – डॉ. दाऊद दळवी
• देवदर्शन जिल्हा ठाणे : मोरेश्वर के. कुंटे व सौ. विजया कुंटे

**– सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी–बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email :subhashinscotland@gmail.com

आजचे खरे संकट हेच की, फार थोड्या जणांच्या अंगी स्वतंत्रपणे लिहिण्या–वागण्याचे धैर्य असते. – जॉन स्टुअर्ट मिल

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

• जिल्हा क्रीडा अधिकारी व ठाणे महानगरपालिकेच्या वतीने घेण्यात आलेल्या क्रीडा शिक्षकांच्या सभेत मुख्याध्यापक माननीय प्रकाश पांचाळ यांचा सत्कार करण्यात आला.

• दि. २७ जुलै २०१८ रोजी इ. ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी गुरुपौर्णिमेचा कार्यक्रम घेण्यात आला. सदर कार्यक्रमास विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी-बेडेकर कला, वाणिज्य ज्येष्ठ महाविद्यालयातील मराठी विभागात कार्यरत असलेले प्राध्यापक मा. संतोष राणे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांशी हसत खेळत सुसंवाद साधला.

• लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्ताने इ. ५ वी ते १०च्या विद्यार्थ्यांसाठी हस्ताक्षर स्पर्धा, वक्तृत्व व चित्रकला इ. स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे माननीय मकरंद जोशी यांच्या हस्ते प्रशस्तिपत्रके देण्यात आली.

• स्काउट-गाईड उपक्रमांतर्गत २० जुलै रोजी टिटवाळा येथे २० स्काउट-गाईड यांच्याकडून वृक्षारोपण करण्यात आले. श्री. जयराम गावित व गाईड कॅप्टन सौ. बोरवणकर यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले.

• ज्ञान प्रबोधिनी संस्थेतर्फे इ. ६वी ड व इ च्या विद्यार्थ्यांना संस्कारक्षम मार्गदर्शन प्रत्येक महिन्याच्या १ल्या व ३ऱ्या शनिवारी करण्यात येते. सदर संस्थेतर्फे स्वरुपा दिघे, शिल्पा म्हात्रे, मुग्धा मुळे व अश्विनी गोखले या मार्गदर्शन करतात.

• झी २४ तास न्यूज चॅनलतर्फे दि. २७ जुलै रोजी सैनिकांना पत्ररुपी राख्या पाठविण्यात आल्या. या कार्यक्रमांतर्गत इ. ८ वीच्या ७० विद्यार्थीनींनी सहभाग घेऊन जवानांना पत्ररुपी राखी पाठविली. सदर कार्यक्रमास मुख्याध्यापक श्री. पांचाळ, पर्यवेक्षक श्री. सोनवणे, कलाशिक्षक श्री. कोळी उपस्थित होते.

• दि. २८ व २९ जुलै रोजी शाळेत इ. ९ वी व १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्त्व शिबिर घेण्यात आले. त्यात डॉ. नाईक, श्री. रमजान शेख, श्री. नांदगावकर, डॉ. अत्तरदे व त्यांचे सहकारी यांनी शालेय व सामाजिक विषयावर मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी स्वखर्चाने विद्यार्थ्यांना अल्पोपाहाराची व्यवस्था केली. या कार्यक्रमास मुख्याध्यापक श्री. पांचाळ व कलाशिक्षक श्री. कोळी उपस्थित होते.

• विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी आवड निर्माण व्हावी तसेच पर्यावरणविषयक जागृकता निर्माण व्हावी यासाठी विद्यार्थ्यांसाठी निसर्ग मंडळ स्थापन करण्यात आले. यात विविध झाडांची, पक्ष्यांची माहिती देण्यात येते. तसेच व्याख्याने व पर्यावरण सहल काढण्यात येते.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ ची सुरुवात झाली. १५ जून पासून त्या आधी म्हणजे १३ जून रोजी पालक शिक्षक सभेचे आयोजन केले गेले. नर्सरी विभागात व ज्युनीयर, सिनीयर विभागात प्रवेश घेतलेल्या सर्व पालकांची ही एकत्रित सभा होती. नर्सरी विभाग प्रमुख सौ. अपर्णा वरूडकर यांनी पालकांना विद्या प्रसारक मंडळ व ए. के. जोशी शाळेच्या विविध विभागासंबंधी माहिती दिली. सर्व विभाग प्रमुख शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा परिचय सर्व पालकांना वरूडकर यांनी

बैलाला शिंगाने पकडता येते, तर माणसाला जिभेने. - जी. हर्बर्ट

करून दिला. नंतर सर्व पालकांनी सर्व वर्गात फिरून शिक्षकांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला.

के. जी. विभागाचा दिनक्रम सुरू होतो प्रार्थना व श्लोक याने. नंतर मुलांना परिपाठ वा मूल्य शिक्षण या अंतर्गत रस्त्यावर थुंकू नये, अन्न वाया न घालवणे यासारख्या गोष्टी सांगितल्या जातात.

जुलै महिन्यात मुलांना प्लॅस्टिक पिशव्या-वस्तू का वापरू नयेत, त्याचे तोटे याची माहिती दिली गेली. कागदी, कापडी, ज्यूट या पिशव्या वापरा असेही सांगितले.

आषाढी एकादशीचा सण २० जुलै रोजी आमच्या विभागात साजरा केला गेला. ज्यूनियर सिनीयरची एक विठ्ठल व एक रखुमाईच्या वेशात आले होते. इतर सर्व मुलांनी वारकऱ्यांचा वेश परिधान केला होता. प्रत्येकाने ज्यूट कागदी वा कापडी यापैकी एखादी पिशवी आणली होती. प्लॅस्टिक पिशवी न वापरता याच पिशव्या वापरा असा संदेश आमच्या बाल वारकऱ्यांनी दिंडीतून दिला. विठूरायाच्या गजराने व प्लॅस्टिक बंदी या विषयावरील गाण्याने ही दिंडी भक्तीमय झाली होती. राजगिऱ्याचा लाडू सर्व वारकऱ्यांना दिला. तसेच सिनीयरच्या प्रत्येक वर्गातील १ अशा ४ मुलांनी प्लॅस्टिक बंद का करावे व सरकारला या बंदीत साथ द्यावी असे आवाहन केले.

शाळेच्या दैनंदिन उपक्रमांतसुद्धा विविधता असते. उदा. शारीरिक शिक्षणाच्या तासात नुसता खेळासाठी नाही तर योगासने, डंबेलस्, लेझिम, ट्रॅमपोलिन, खो-खो, पकडापकडी सारख्या सांघिक खेळांचाही समावेश केला जातो.

अभ्यासक्रमाबरोबरच मुलांना संगीत व वाचन याची गोडी लागावी यासाठी दोनही विषयांचे आठवड्याला १ तासिका असे नियोजन केले जाते.

२०१८-१९ नर्सरी विभागाचे दुसरे वर्ष १३ जून २०१८ रोजी नर्सरी विभागप्रमुख सौ. अपर्णा वरूडकर ह्यांनी शाळेच्या गार्गी सभागृहात नर्सरी विभागाच्या पालकांची सभा घेतली. स्लाईड शो द्वारे शाळेची नर्सरीच्या अभ्यासक्रमाची, विविध उपक्रमांची थोडक्यात माहिती सांगितली.

१५ जून पासून शाळा सुरू झाली. नर्सरी विभागाचे दोन वर्ग आहेत. टेडी आणि पपी. प्रत्येक वर्गाची पटसंख्या २५ आहे. प्रत्येक वर्गात दोन शिक्षिका व मुलांच्या मदतीसाठी मावशी आहेत. दोन्ही वर्ग वातानुकुलीत आहेत. तसेच मुलांना बागेत खेळायला त्यांच्या वयाला योग्य आणि सुरक्षित असे झोपाळे, घसरगुंडी व इतर साधने आहेत.

शाळेचा रोजचा दिनक्रम सामूहिक प्रार्थनेने सुरू होतो. नंतर परिपाठा अंतर्गत विविध श्लोक शिकविले जातात. पुस्तकांची काळजी कशी घ्यावी, एकमेकांना मदत करणे, खेळणी, खाऊ वाटून घ्यावा इ. सांगितले जाते. शालेय वातावरणाशी एकरूप होण्यासाठी सुरुवातीला मुलांना भरपूर खेळायला दिले. तसेच सुरुवातीचे काही दिवस त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी काही उपक्रम घेतले. उदा. स्वतःच्या चपला स्वतः काढणे व घालणे, बॅग आणि वॉटर बॉटल व्यवस्थित ठेवणे, डबा खाण्यापूर्वी आणि खाऊन झाल्यानंतर हात धुणे इत्यादी. नंतर त्यांचे शिकविण्याचे तास सुरू झाले.

पूर्व प्राथमिक विभागाप्रमाणेव नर्सरी विभागातही हसत खेळत शिक्षण पद्धती अवलंबिली आहे. इंग्रजी, गणित, परिसर अभ्यास यांचे ज्ञान मुलांना चित्र, निरनिराळ्या वस्तू, चित्रांची पुस्तके, प्रात्यक्षिके, अवलोकन, खेळ, गाणी इत्यादी माध्यमांतून दिले जाते.

स्थूल आणि सूक्ष्मकारक विकासासाठी मणी वेगळे

ज्याला आपण अस्सल लिखाण समजतो, ते बहुधा नकळत केलेले वाङ्मयचौर्य असते. - डब्ल्यू. आर. अिंग

करणे, ओवणे, स्पूनींग, हिरव्या फळ्यावर खडूने लिहिणे चित्रकला वहीत वेगवेगळे ठसे-काम करून घेणे, फाडलेले कागदाचे तुकडे फुग्याच्या आकृतीत चिटकविणे इत्यादी. तसेच टायर, कुलर रिंग वापरून कसरती करणे, रांगणे, धावणे इत्यादी उपक्रम घेतले.

अभ्यासाबरोबरच मुलांना गाणी, नृत्याची आवड निर्माण व्हावी यासाठी दर आठवड्याला एका तासिकेचे नियोजन केले जाते.

मुलांनी आणलेल्या लाल, पिवळ्या रंगाच्या खेळण्यांचे तसेच वस्तूंचे प्रदर्शन भरविले. बोलक्या बाहुल्यांद्वारे ससा कासवाची गोष्ट सांगण्यात आली. मुलांना खूप मजा आली. पालकांच्या मदतीने मुलांनी A, B, C, D अक्षरांनी सुरू होणाऱ्या शब्दांची चित्रे कागदावर काढली व चिटकविली. ते कागद शिक्षकांनी वर्गात लावले.

प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात पालक सभा घेण्यात येते. त्या सभेत पालकांचे अभ्यासक्रमा संदर्भात असणाऱ्या शंकांचे निरसन केले जाते. तसेच पाल्याची शैक्षणिक व वैयक्तिक प्रगती सांगितली जाते. सामान्य सूचना दिल्या जातात.

गुरुवार दि. २१ जून २०१८ रोजी जागतिक योग दिवस म्हणून साजरा केला जातो. प्राथमिक विभागाच्या इ. १ ली ते ४थीच्या विद्यार्थ्यांनी सामूहिक योगिक आसने व विविध प्राणायामाचे प्रकार करून साजरा केला. दैनंदिन जीवनात योग प्रकार करण्याचे फायदे व महत्त्व विद्यार्थ्यांना सांगण्यात आले.

सोमवार दि. २५ जून २०१८ रोजी श्रीमती रोशन जाल पटेल मॅडम यांच्या स्मरणार्थ इ. १ली ते ४थीच्या विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

दि. ३ व ४ जुलै २०१८ रोजी इ.१ली ते ४थीच्या विद्यार्थ्यांना पर्यावरणावर आधारित निसर्ग रम्य चित्रफित दाखवण्यात आली.

शुक्रवार दि. २० जुलै २०१८ रोजी इ. ४थीच्या विद्यार्थ्यांनी 'पुंडलिक वरदे हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम' या जयजयकाराने छोटे वारकरी व संत साकारत प्लास्टीक बंदीबाबत जनजागृतीसाठी कीर्तन सादर करून त्यात दिंडीचेही सादरीकरण केले.

२० जुलैला आषाढी एकादशी साजरी करण्यात आली. टेडी ग्रुपची अन्वी केळकर तर पपी ग्रुपचा चैतन्य सावंत विठ्ठल रखुमाई झाले होते. सामूहिक प्रार्थनेत शिक्षकांनी मुलांना त्यांच्या वयाला समजेल अशी थोडक्यात आषाढी एकादशीची माहिती सांगितली. नंतर छोट्या वारकऱ्यांनी शाळेच्या पटांगणात विठ्ठल रखुमाईसमोर गाणी गात पुस्तकांची दिंडी काढली. शिक्षकांनी मुलांना पुस्तकाची काळजी घेण्याची शिकवण दिली. राजगिऱ्याचा लाडू प्रसाद म्हणून देण्यात आला.

२३ जुलैला मुले डब्यात छोटे केळे घेऊन आले होते. ते त्यांनी स्वतः सोलून खाल्ले.

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

### चित्रपट निर्मिती कार्यशाळा




दि. २५ जुलै २०१८ रोजी महाविद्यालयाच्या पत्रकारिता व संज्ञापन विभागातर्फे चित्रपट निर्मिती

कार्यशाळा आयोजित करण्यात आली. राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार प्राप्त व ज्येष्ठ दिग्दर्शक श्री. विजू माने यांनी आपल्या खुमासदार शैलीत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. चित्रपट निर्मिती करण्यात अंतर्भूत असलेल्या पटकथा, संवाद लेखन, कॅमेरा, दिग्दर्शन इत्यादी विषयांवर त्यांनी मार्गदर्शन केले. डॉ. महेश पाटील, डॉ. संगीता दास, डॉ. विमुक्ता राजे, प्रा. प्रशांत धर्माधिकारी यांनी संयोजनात सहभाग घेतला. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम आयोजित करण्यात आला. बीएमएम विभागाचे बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

**जोशी बेडेकर कॉलेज फिल्म सोसायटीच्यावतीने 'सेंट्रल स्टेशन' या ॲकॅडमी ॲवार्ड प्राप्त ब्राझीलीयन चित्रपट दाखवण्यात आला.** जोशी बेडेकर फिल्म सोसायटी ही ठाण्यातील एकमेव कॉलेज कॅम्पस सोसायटी आहे, ज्या माध्यमातून विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त चित्रपट दाखवण्यात येतात. विद्यार्थ्यांची चित्रपट व त्यांची रसास्वाद करण्यासाठी लागणारी कौशल्ये यातून विकसित होतात. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.



या चित्रपटाच्या निमित्ताने डॉ. महेश पाटील यांनी आपले विचार व्यक्त केले. फिल्म सोसायटीचे समन्वयक प्रा. प्रशांत धर्माधिकारी यांनी चित्रपट प्रदर्शनानंतर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या IQAC विभागाकडून ज्येष्ठ अभ्यासक सि. बी. तिवारी यांचे Motivational Challenges of the New Generation या विषयावर व्याखयान आयोजित करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी प्रास्ताविक केले. रवींद्रनाथ टागोर व साक्रेटिस या तत्त्वज्ञांचा दाखला देत शिक्षणाचा मूलभूत विचार विशद केला.



श्री. तिवारी यांनी आधुनिक पिढीला जनरेशन Z अर्थात 'जेन झी' ही संज्ञा दिली. बदलत्या पिढीला शिकवताना यू ट्यूब, इंटरनेट आदी आधुनिक साधनांचा वापर करून शिकवल्यास अधिक फायदा होईल असे ते म्हणाले. या व्याख्यानास महाविद्यालयातील प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**गुरू पौर्णिमा उत्सव २०१८**



दि. २७ जुलै रोजी महाविद्यालयाच्या 'सर्ज' या माजी विद्यार्थी संस्थेच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या गुरू पौर्णिमा उत्सव २०१८ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाच्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या हिंदी विभागातील माजी प्राध्यापक

श्री. प्रकाश बच्छाव कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी असलेल्या व सध्या महाविद्यालयात शिकवत असलेल्या प्राध्यापकांनी रु.२१,००० चा धनादेश महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांना सुपूर्द केला. यावेळी महाविद्यालयाच्या सर्ज या माजी विद्यार्थी मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती माधवी नाईक व खजिनदार श्री. साळवी तसेच प्रा. श्रीमती दीक्षित व्यासपीठावर उपस्थित होत्या.

डॉ. नाईक यांनी प्रस्तावनेत 'गुरू परंपरेची चालत आलेली परंपरा समाजाला एक व्यापक आयाम देते' असे प्रतिपादन केले. ज्येष्ठ साहित्यिक विंदा करंदीकर यांनी लिहिलेल्या 'करितो आदरे सद्गुरू स्मरण' या प्रसिद्ध कवितेचा दाखला देत डॉ. सुचित्रा नाईक यांनी विद्यार्थी कल्याण निधीची संकल्पना उपस्थितांस समजावून सांगितली.

या प्रसंगी प्रा. प्रकाश बच्छाव यांनी त्यांच्या एकूण जडणघडणीत महाविद्यालयाचा असलेला वाटा कृतज्ञपणे व्यक्त केला.

यावेळी महाविद्यालयाच्या विविध विभागांतील अनेक गुणी विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात आले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

### साहित्यिक कौशल्ये वृद्धिंगत करणे या विषयावर कार्यशाळा



आपण इतरांशी कसे भाष्य करतो यावर आपले व्यक्तिमत्त्व अवलंबून असते. आपले बोलणे प्रभावी असले पाहिजे. तरच आपण इतरांना आपल्या बोलण्यात गुंतवून ठेवू शकतो. यासाठी भाषेवर प्रभुत्व असणे फार गरजेचे आहे.

या विषयावरील मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळावे या हेतूने ठाण्याच्या जोशी-बेडेकर महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाने 'साहित्यिक कौशल्ये वृद्धिंगत करणे' या विषयावर ३१ जुलै २०१८ रोजी कार्यशाळा आयोजित केली होती. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी प्रख्यात ॲडव्होकेट शैलेश सडेकर हे प्रमुख वक्ते म्हणून लाभले होते. वक्तृत्व, वादविवाद, कथालेखन यांसारख्या स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी कोणत्या गोष्टी आवश्यक आहेत. याबद्दल अत्यंत उपयुक्त असे मुद्दे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

### रक्तदान शिबिराचे आयोजन

'रक्तदान हेच श्रेष्ठदान', 'रक्तदाता हाच जीवनदाता' असे आपण म्हणतो. आजच्या काळात वाढते अपघात आणि इतर आजारांमुळे रक्ताची मागणीही वाढत आहे. यासाठीच रक्तदान नियमित होणे आवश्यक आहे.




हीच गरज लक्षात घेत, ठाण्याच्या जोशी-बेडेकर महाविद्यालयात एन्.सी.सी. नवल विभागाने १ ऑगस्ट २०१८ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. एकूण २०५ विद्यार्थ्यांनी याकरिता नोंदणी केली होती आणि ३५० मिली.च्या १४० रक्ताच्या पिशव्या गोळा

झाल्या. अशा प्रकारे डॉक्टरांच्या व महाविद्यालयातील विद्यार्थी आणि शिक्षकांच्या उपस्थितीत हे शिबिर पार पाडले.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

### आंतरराष्ट्रीय परिषद पूर्व कार्यशाळेचे आयोजन

वि.प्र.मं.च्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयामध्ये आंतरराष्ट्रीय परिषद पूर्व कार्यशाळेचे आयोजन २७ जुलै २०१८ रोजी करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या प्राणीशास्त्र व पर्यावरणशास्त्र विभागातर्फे १२-१९ जानेवारी २०१९ रोजी "Ecology Ethology and Environmental Management" या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद संपन्न होणार आहे. या परिषदेकरिता विद्यार्थ्यांची तयारी होण्याच्या दृष्टीने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माधुरी किरण पेजावर यांनी या परिषदेच्या आयोजनामागचे महत्त्व सांगितले.

या कार्यशाळेचे वक्ते श्री. आनंद शिंदे यांनी "A Dialog with Elephant" या विषयावर संवाद साधला. यावेळी त्यांनी हत्तींशी संवाद कसा साधावा त्याची देहबोली याबाबत आपले अनुभव सांगितले. जवळ जवळ २० वर्षे हत्तीच्या भाषेचा अभ्यास करणाऱ्या अवलियाने हत्तीच्या १ महिन्याच्या पिल्लापासून ते मोठ्या हत्तीणीबरोबर संवाद करण्याकरता काय काय कल्पना वापरल्या याबद्दल विवेचन केले व विद्यार्थ्यांना भारावून टाकले.

या कार्यशाळेतील लाभलेले दुसरे वक्ते श्री. प्रेमसागर मिस्त्री यांनी "Vulture Conservation" याबाबत माहिती सांगितली. गिधाड संवर्धन करताना सामोरे जावे लागणाऱ्या आव्हानांबद्दल त्यांनी प्रकाश टाकला. १८-१९ वर्षांपूर्वी सापडलेल्या एका गिधाडांच्या जोडीची आता शंभरपेक्षा जास्त गिधाडं झाली आहेत व दरवर्षी ही गिधाडे महाडजवळ चिरगावच्या जंगलात घरटी बांधतात व पिल्लांना जन्म देतात हे ऐकून सर्वांनाच आनंद झाला. खरंतर मेलेल्या जनावरावर ताव मारणाऱ्या या प्राण्यावर प्रेम करून त्यांचे संवर्धन करणाऱ्या या युवकाचे कौतुकच केले पाहिजे.

ही दोन्ही व्याख्याने पर्यावरणविषयक जागृती करणारी व मानवी जीवनाचा वन्य जीवांशी संपर्क करण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरली. यावेळी २५० विद्यार्थी उपस्थित होते.

### केमिस्ट्री क्लब 'ऊर्जा' अंतर्गत 'वायुमंडल' वर प्रात्यक्षिकांसह व्याख्यान संपन्न

'केमिस्ट्री क्लब' (Chemistry Club) च्या अंतर्गत नुकतेच 'वायुमंडल' या विषयावर भाभा अणुसंशोधन केंद्रातील निवृत्त वैज्ञानिक अधिकारी श्री. नरेंद्र गोळे यांचे विविध रंजक प्रात्यक्षिकांसह व्याख्यानाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

या शैक्षणिक वर्षातील केमिस्ट्री क्लबचे पहिले पुष्प श्री. नरेंद्र गोळे यांच्या विज्ञान आणि रंजकतेने परिपूर्ण अशा व्याख्यानाने गुंफले गेले. यामध्ये त्यांनी इयत्ता आठवीच्या विज्ञान पाठ्यपुस्तकातील उदाहरणांपासून ते (म्हणजे साधा पाण्याने भरलेला ग्लास उलटा केला असता व त्याच्या तोंडावर एक कागद ठेवला असता आतील पाणी सांडत नाही.) ते अवकाशातील वायुमंडलातील हवेचा दाब इथपर्यंत विद्यार्थ्यांच्या मनातील सर्व शंकाचे विविध प्रात्यक्षिकांद्वारे निरसन केले.

यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. डी. आर.

मानवी जीवनात चांगुलपणा म्हणून जो आहे, तो सारा आज्ञाधारकपणामध्ये सामावला आहे. - सिसेरो

अंबावडेकर व प्रमुख पाहुणे यांच्या शुभहस्ते नवीन वर्षातील केमिस्ट्री क्लबचे औपचारिक उदघाटन झाले. वर्षभर या क्लबद्वारे विज्ञान रंजक माहिती देणाऱ्या व्याख्यानांचे आयोजन केले जाईल अशी खात्री याप्रसंगी केमिस्ट्री क्लबचे समन्वयक प्रा. प्रल्हाद वाघ यांनी दिली. व्याख्यानाची सांगता होताना रसायनशास्त्राच्या प्रयोगशाळेबाहेर व छतावर दोन वायुमंडलांची अनुभूती देणारे 'महाकाय' प्रयोगही करण्यात आले. राष्ट्रगीताने या कार्यक्रमाची सांगता झाली.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

### महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (MSBTE) उन्हाळी सन २०१७-१८ परीक्षेचे निकाल जाहीर

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या उन्हाळी सन २०१७-१८ या वर्षीच्या परीक्षेचे निकाल नुकतेच जाहीर झाले आहेत. विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांनी चांगले घवघवीत यश संपादन केले आहे. तंत्रनिकेतनमध्ये अव्वल मार्कांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची कोर्सनुसार नावे व गुण खालीलप्रमाणे आहेत.

**प्रथम वर्ष (SEM I + SEM II)**

| अ. क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | कोर्स | पैकी मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | पुजारी निरिक्श रमेश | CO | १३५४/१५०० | ९०.२७% |
| २. | पाण्डे रविकुमार अनिलकुमार | CO | १३३०/१५०० | ८८.६७% |
| ३. | पाडावे नियंती प्रमोद | CO | १२५६/१५०० | ८३.७३% |
| १. | सुर्वे अकुंश अनिल | EP | १२४९/१४०० | ८९.२१% |
| २. | वाडकर गौरी रमेश | EP | १२२४/१४०० | ८७.४३% |
| ३. | आशुतोष कुमार | EP | ११७६/१४०० | ८४.००% |
| १. | मेस्त्री ब्रह्मणी विलास | IE | ११९४/१४५० | ८२.३४% |
| २. | मेहता व्रज निलेश | IE | १०५०/१४५० | ७२.४१% |
| ३. | अगाशे मुक्ता विक्रांत | IE | १०१६/१४५० | ७०.०७% |
| १. | विचारे सोहन शरद | IF | १२८३/१५०० | ८५.५३% |
| २. | सिंग प्रिथम उपेंद्र | IF | ११५६/१५०० | ७७.०७% |
| २. | शेख रुफी ईक्बाल | IF | ११५६/१५०० | ७७.०७% |
| ३. | पोळ प्रेरणा महादेव | IF | ११३६/१५०० | ७५.७३% |
| १. | राव शिरीष निलेश | IS | १११८/१५०० | ७४.५३% |
| २. | भोगटे गौरव दिनेश | IS | ९४४/१५०० | ६२.९३% |
| ३. | मोहम्मद असजद | IS | ८९४/१५०० | ५९.६०% |

## द्वितीय वर्ष (SEM III + SEM IV)

| अ. क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | कोर्स | पैकी मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | पाठक अलोक राजेश | CH | १४७१/१६५० | ८९.१५% |
| २. | नलावडे स्नेहल गोविंद | CH | १२४३/१६५० | ७५.३३% |
| ३. | परब सिद्धांत शिरीषकुमार | CH | ११३९/१६५० | ६९.०३% |
| १. | अघा लिझा शाहीद | CO | १५९०/१७५० | ९०.८६% |
| २. | देसाई आदिती संदीप | CO | १५५५/१७५० | ८८.८६% |
| ३. | कर्नाटकी सोनाली सुधाकर | CO | १५४२/१७५० | ८८.११% |
| १. | थोरात ऋतुजा दिगांबर | EP | १४४२/१७०० | ८४.८२% |
| २. | सोना शिवानी विजय | EP | १३५७/१७०० | ७९.८२% |
| ३. | धुमाळ सुदेश चंद्रकांत | EP | १३४४/१७०० | ७९.०६% |
| १. | बागवे निखिल प्रकाश | IE | १४१३/१६०० | ८८.३१% |
| २. | जोशी श्रेयस सतीश | IE | १४०५/१६०० | ८७.८१% |
| ३. | नेल सेबास्टेन | IE | १३०५/१६०० | ८१.५६% |
| १. | सुरभी गावडे | IF | १४९२/१७५० | ८५.२६% |
| २. | सणस अबोली अनील | IF | १४७६/१७५० | ८४.३४% |
| ३. | वनारे श्रिया सुनील | IF | १४७४/१७५० | ८४.२३% |
| १. | पाटील गौरव कमलाकर | IS | १३४३/१६०० | ८३.९४% |
| २. | अधिकारी आशीष गोपाल | IS | १७२५/१६०० | ७९.६९% |
| ३. | सय्यद उसमान गॉस | IS | १२३४/१६०० | ७७.१३% |
| १. | राणे कृष्णा दिनेश | MU | १४०७/१६०० | ८७.९४% |
| २. | गायकवाड अनुष्का बाळकृष्ण | MU | ११८४/१६०० | ७४.००% |
| ३. | गडहिरे कुणाल भालेराव | MU | ११२६/१६०० | ७०.३८% |

## तृतीय वर्ष (SEM V + SEM VI)

| अ. क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | कोर्स | पैकी मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | नांदडोसकर गौरव मनोहर | CH | १४२१/१६५० | ८६.१२% |
| २. | इंगळे प्रणव जीवन | CH | १३७८/१६५० | ८३.५२% |
| ३. | जुवाटकर दर्शन गंगाराम | CH | १३४९/१६५० | ८१.७६% |

कोणत्या तरी स्वर्गीय आणि अत्युच्च शक्तीच्या भीतीने माणसे आज्ञाधारक बनतात. – बर्टन

| अ. क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | कोर्स | पैकी मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | पाताडे प्रणव नितीन | CO | १५२२/१६०० | ९५.१३% |
| २. | पाण्डे विश्वेश भानुप्रकाश | CO | १४९३/१६०० | ९३.३१% |
| ३. | गुप्ता समीक्षा राजेश | CO | १४९२/१६०० | ९३.२५% |
| १. | जोशी प्रिया श्रीविठ्ठल | EP | १३६३/१६५० | ८२.६१% |
| २. | विशे हर्षला विजय | EP | १३४८/१६५० | ८१.७०% |
| ३. | जाधव परेश नितीन | EP | १३३३/१६५० | ८०.७९% |
| १. | होडशील प्रतिक्षा ज्ञानदेव | IE | १६१५/१७५० | ९२.२९% |
| २. | राठोड हर्बल राजेश | IE | १५५७/१७५० | ८८.९७% |
| ३. | चौहान सिमरन सुरेश | IE | १५३६/१७५० | ८७.७७% |
| १. | जोशी हेत राकेशकुमार | IF | १५७५/१७०० | ९२.९५% |
| २. | गोळे प्राजक्ता दिलीप | IF | १५७२/१७०० | ९२.४७% |
| ३. | भोईर निमिषा विद्याधर | IF | १४९८/१७०० | ८८.१२% |
| १. | बाळू राजाराम कुंडे | IS | १४९९/१७०० | ८८.१८% |
| २. | सावंत सोहम सतीश | IS | १४७२/१७०० | ८६.५९% |
| ३. | पाटील शीतल रमेश | IS | १४६८/१७०० | ८६.३५% |
| १. | शाह तबासुम मोह. शकील | MU | १४५९/१६०० | ९१.१९% |
| २. | माने गायत्री संजय | MU | १४०५/१६०० | ८७.८१% |
| ३. | निघुट ज्योती शंकर | MU | १३८७/१६०० | ८६.६९% |
| ३. | बोरसे स्नेहल संजय | MU | १३८७/१६०० | ८६.६९% |

वरील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे तंत्रनिकेतनचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक वर्ग या सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात आले.

**टिटवाळा येथील देवराईमध्ये वृक्षारोपण कार्यक्रम**

दि. २९ जून २०१८ रोजी वि. प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतनच्या केमिकल इंजिनियरिंग आणि मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स विभागाच्या विद्यार्थ्यांकडून पर्यावरण दक्षता मंडळ, टिटवाळा येथील देवराई येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम करण्यात आला. जवळ जवळ १३ विद्यार्थी आणि ३ शिक्षकांचा त्यात सहभाग होता. टिटवाळ्यापासून ५ कि.मी. अंतरावर देवराई हे ठिकाण काळू नदीकिनारी आहे.

•••

*दिशा संपर्क दूरध्वनी*

**०२२-२५४२ ६२७०**

(**संपादकीय** .... पृष्ठ क्र. २ वरून )

अटलजींचे 'न दैन्यं न पलायनम्।' व 'मेरी इक्यावन कविताएँ' हे दोन कविता संग्रह हिंदी साहित्यातील अजरामर कलाकृती आहेत. त्यातील अनेक कवितांना मंत्राचे मांगल्य प्राप्त झाले आहे. 'पंद्रह अगस्त की पुकार', 'कदम मिलाकर चलना होगा' 'कौरव कोन, कौन पांडव', 'दूध मे दरार पड गई', 'क्षमा याचना', 'पुनः चमकेगा दिनकर', 'जीवन की ढलने लगी साँस', 'एक बरस बीत गया', 'आओ फिरसे दिया जलाये', इत्यादी अनेक कविता त्यात आहेत.

अटलजींच्या कवितेने भारताकडे पाहण्याचा नवा दृष्टीकोन दिला -

'दुनिया का इतिहास पुछता, रोम कहाँ यूनान कहाँ?
घरघरमें शुभ अग्नी जलाता, वह उन्नत ईरान कहाँ है।
दीप बुझे पश्चिमी गगन के व्याप्त हुआ बर्बर अंधियारा
किन्तु चीरकर तमकी छाती, चमका हिन्दुस्थान हमारा।'

वरील ओळी इकबाल या प्रसिद्ध शायराच्या खालील ओळींचे स्मरण करवून देतात-

युनान-मिस्त्र रोमा सब मिट गये जहाँ से।
अब तक मगर है बाकी नामोनिशाँ हमारा।
कुछ बात है की हस्ती मिटती नही हमारी।
सदीयों रहा है दुश्मन दौर-ए-जमां हमारा।

अटलजींच्या कवितेचा अजून एक पैलू म्हणजे 'आशावाद'. त्यांच्या कवितेने दगडाच्या छातीत नवीन अंकूर फोडला. त्यांच्या 'गीत नया गाता हूं' या प्रसिद्ध कवितेत ते म्हणतात -

'टूटे हुए तारों से फूटे वासंती स्वर
पत्थर की छाती मे उग आया नव अंकुर
झरे सब पीले पात कोयल की कुहक रात
प्राची मे अरुणिमा की रेख देख पाता हूँ
गीत नया गाता हूँ।'

वरील कविता वाचताना इंग्रजी साहित्यातील व्हिक्टोरियन युगाच्या युगप्रवर्तक कवी अल्फ्रेड टेनिसन व रॉबर्ट ब्राऊनिंग यांच्या कवितांची सहज आठवण येऊन जाते. रॉबर्ट ब्राऊनिंगच्या 'The Last Ride Together' या कवितेतील आशावाद तसा एका प्रेमी युगुला भोवतीच रुंजी घालतो. प्रेयसीने नकार दिल्यावरही प्रियकर तिला एक शेवटची मागणी करतो. ती म्हणजे घोड्यावर एकत्र रपेट मारण्याची. तेवढ्या काळात प्रेयसीचे मन बदलेल व न जाने ती तयार होईल हा प्रियकराचा सीमित आशावाद. मात्र अल्फ्रेड टेनिसन (१८०९-१८९२) याचा युलिसीस मोठाच आशावादी आहे. वय झाल्यावर जराजर्जर अवस्थेत देखील युलीसीसला विस्तीर्ण पसरलेलं क्षितिज खूणावू लागते. टेनिसच्या 'Ulysses' या कवितेत तो म्हणतो -

I cannot rest from travel : I will drink Life to the less:
It is not too late to seek a newer world.
To sail beyond the sunset and the baths
of all the western stars, until I die.
Made weak by time and fate, but strong in will
To strive, to seek, to find, and not to yield

युलिसीसचा नवसृजनाचा, नवीन शोधाचा व कुठल्याही परिस्थितीत नशीबाला शरण न जाण्याचा धाडसी आशावाद मनाला भावून जातो.

अटलजींच्या कवितेत हा आशावाद व्यक्तीकेंद्री राहात नाही. तो व्यष्टीपासून समष्टीकडे जातो-

हम पडाव को समझे मंजिल।
लक्ष्य हुआ आंखो से ओझल।
वर्तमान के मोहजाल मे।
आनेवाला कल न भुलाएँ।
आओ फिरसे दिया जलाएँ।
आहुति बाकी यज्ञ अधूरा।
अपनों के विघ्नो ने घेरा।
अंतिम जयका वज्र बनाने।
नव दधीची हड्डीयां गलाएँ।
आओ फिरसे दिया जलाएँ।।

जे खरेखुरे उदात्त वृत्तीचे असतात, त्यांना भीती माहीत नसते. - शेक्सपीअर

अटलजींच्या कवितेत मृत्यूचे मोठे लोभस रूप दृग्गोचर होते. कवितेत मृत्यूला सह्रदाची उपमा देऊन त्याच्याशी दोस्ती करण्याचा मानस अटलजी करतात. 'मौत से ठन गई' या कवितेत ते म्हणतात :

जूझने का मेरा इरादा न था।
मोड पर मिलेंग इसका वादा न था।
रास्ता रोककर खडी हो गई।
यूँ लगा जिन्दगी से बडी हो गई
मौत की उमर क्या है दो पल भी नही,
जिन्दगी सिलसिला, आज कल की नहीं।

'अपने ही मनसे कुछ बोले' या अप्रतिम कवितेत अटलजी जगण्याचं रहस्य सांगतात. जन्ममृत्यूच्या आवर्तातून केवळ आत्मपरिक्षणरुपी चिंतनच तारू शकेल असा आशावाद ते व्यक्त करतात.

'जन्म मरण अविरत फेरा।
जीवन बंजारो का डेरा।
आज यहाँ, कल कहाँ कूच है।
कौन जानता किधर सवेरा।
एक दृष्टी बीतीपर डाले, यादों की पोटली टटोले!
अपने ही मन से कुछ बोले।

बशीर बद्र या प्रख्यात शायराचा एक शेर आठवूण जातो –

'उजाले अपनी यादों के हमारे साथ रहने दो
न जाने किस गली मे जिंदगीकी शाम हो जाए।।

अटलजींच्या असीम काव्यप्रतिभेचा मागोवा घेणं म्हणजे स्वतःच स्वतःशी हितगूज करण्यासारखं आहे.

अटलजींनी 'अपने ही मनसे कुछ बोले' या वरील कविता 'यादोंकी पोटली टटोले' असा सल्ला दिला. प्रगतीचा नवा सुर्योदय हा पाश्च्यात्यांच्या कर्जाऊ विचारांनी होणार नाही हे अटलजींना माहीत होतं. म्हणूनच त्यांनी 'पडोसीसे' या आपल्या कवितेत पाकिस्तानला खडे बोल सुनावले आहेत.

नुकतेच दिवंगत झालेल्या व भारतीय इंग्रजी साहित्याचा साक्षेपी आवाज असलेल्या नोबेल विजेत्या व्हि. एस. नायपॉल यांनी आपल्या 'India :'A Wounded Civilization' या ग्रंथात लिहिलंय –

"India is old, and India continues. But all the disciplines and skills that India now seeks to exercise are borrowed. Even the ideas Indians have of the achievements of their civilization are essentially the ideas given them by European Scholars in the nineteenth century. India by itself could not have rediscovered or assessed its past."

अटलजींनी दिलेल्या मार्गावर चालणं आज कधी नव्हे इतके क्रमप्राप्त झाले आहे. आपल्या जगण्यातील भारतीय विचार गमावून बसलेल्या व स्वार्थी बनत चाललेल्या युगात अटल बिहारी वाजपेयी या युगद्रष्ट्या कवीची साद आपणास घालायला हवी. पोखरणच्या अणुचाचणीने भारताला अणुऊर्जेच्या माध्यमातून बलवान करणाऱ्या या नेत्याला भारतीय मानस मनापासून बलशाली करायचे होते. आत्मपरिक्षणाचा 'यादोंकी पोटली टटोले' हा सल्ला केवळ व्यक्तीपुरताच मर्यादीत न ठेवता राष्ट्रस्तरावर न्यायला हवा व भारतीय संस्कृतीच्या संबंधाने आपल्या जगण्याला एक नवा आयाम यायला हवा हीच अटलजींना श्रद्धांजली ठरेल. भारताला विश्वगुरू बनवण्यासाठी व अंतिम विजयाचे वज्र बनवण्यासाठी नवदधीची होवून आपल्या अस्थी परत एकदा दान कराव्या लागतील. बा. भ. बोरकरांसारख्या युगद्रष्ट्या कवीच्या शब्दातच त्यांना शब्दवंदना देणे शक्य आहे –

देखणी ती पाऊले जी ध्यासपंथे चालती।
वाळवंटातून सुद्धा स्वस्तिपद्मे रेखिती।
देखणी ती जीवने जी तृप्तीची तीर्थोदके।
चांदणे ज्यातून वाहे शुभ्र पाऱ्यासारखे।
देखणा देहांत तो जो सागरी सुर्यास्तसा।
अग्निचा पेरुनि जातो रात्रगर्भी वारसा।

**– प्रा. प्रशांत पु. धर्माधिकारी**

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❈ संपर्क ❈**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे – ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे–४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे – ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.